# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६३ वे अंक ६०) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. - ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार, दि.२२ फेब्रुवारी २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


## आजपासून निवासी डॉक्टरांची संपाची हाक

मुंबई दि.२१ (प्रतिनिधी)- आपल्या विविध मागण्यांसाठी सरकारकडून वारंवार केवळ आश्वासनेच मिळत असून, त्यावर ठोस कार्यवाही होत नाही. त्यामुळे निवासी डॉक्टरांची संघटना असलेल्या 'मार्ड'ने गुरूवारी सायंकाळी ५ वाजल्यापासून राज्यव्यापी संप पुकारण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र या संपामध्ये मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालतील निवासी डॉक्टर सहभागी होणार नसल्याचे बीएमसी मार्डकडून स्पष्ट करण्यात आले आहे. राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयामधील डॉक्टरांची संख्या वाढत आहे. मात्र त्या तुलनेत वसतिगृहांच्या संख्येत वाढ करण्यात आलेली नाही, तसेच वसतिगृहाची दूरवस्था झाली असून तेथे सोयी- सुविधांचा अभाव आहे. यामुळे वसतिगृहांची तातडीने दुरुस्ती करावी आणि बांधकामासाठी निधी उपलब्ध करावा. तसेच निवासी डॉक्टरांचे प्रलंबित मानधन तात्काळ द्यावे, त्यांना विद्यावेतन वेळेवर द्यावे, विद्यावेतनामध्ये १० हजार रुपयांपर्यंत वाढ करावी आदी मागणीसाठी केंद्रीय मार्डने ७ फेब्रुवारीपासून बेमुदत संप पुकारण्याचा इशारा दिला होता. मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मार्डच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्या मान्य करण्यात येतील, असे आश्वासन दिल्याने संप मागे घेण्यात आला होता. मात्र दोन आठवडे उलटले तरी त्याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. त्यामुळे दोन दिवसांपूर्वी मार्डने मागण्यांबाबत पाठपुरावा करून संपाचा इशारा दिला. मात्र कोणताही तोडगा न निघाल्याने केंद्रीय मार्डने २२ फेब्रुवारी सायंकाळी ५ वाजल्यापासून अनिश्चित काळासाठी राज्यव्यापी संप पुकारण्याचा निर्णय जाहीर केला असल्याची माहिती केंद्रीय मार्डचे अध्यक्ष डॉ. अभिजीत हेलगे यांनी दिली.

# मराठा आरक्षणाचा लढा; अजय बारसकर महाराज V/S मनोज जरांगे यांच्यात जुंपली

## मनोज जरांगे हा पलटी मारणारा माणूस; बारसकर महाराजांचा आरोप

मुंबई दि.२१ (प्रतिनिधी)- मनोज जरांगे कायम पलटी मारतात, खोटं बोलतात, असा आरोप करत मनोज जरांगे यांचे कोअर कमिटीचे सदस्य असलेले अजय महाराज बारस्कर यांनी जोरदार हल्लाबोल केलाय. मनोज जरांगे हे रोज खोटं बोलत असल्याचा आरोप देखील त्यांनी केला. अजय बारस्कर यांनी आज मुंबईमध्ये पत्रकार परिषद घेऊन मनोज जरांगे यांच्यावर घणाघाती टीका केली.

मी गेल्या अनेक वर्षांपासून मराठा समाजाच्या आरक्षणासाठी लढा देत आहे. मधल्या काळामध्ये आंतरवाली सराटीमध्ये जी घटना घडली, त्यानंतर मी आंदोलनाच्या या लढ्यात पुन्हा एकदा सहभागी झालो. मराठवाड्यात ओबीसी नोंदणीसाठी मी अनेक वर्षांपासून काम करतोय. त्यामुळेच मी मनोज जरांगे यांच्या सोबत सहभागी झालो होतो. मात्र, यापूर्वी कधीच मी माध्यमांसमोर आलो नाही. मनोज जरांगे हा अत्यंत हेकेखोर माणूस आहे. तो कोणत्याही शब्दावर अडून राहत होता. आमचा समाज खूप भोळा आहे. मात्र, मनोज जरांगे हे कायम पलटी मारतात आणि रोज खोटे बोलतात, असा आरोप अजय महाराज बारसकर यांनी केला आहे.

मी पैशासाठी किंवा प्रसिद्धीसाठी असे आरोप करतोय, असे अजिबात नाही. मी कीर्तनाचे पैसे वगैरे घेत नाही. मात्र, मनोज जरांगे यांच्या प्रत्येक कृतीचा मी साक्षीदार आहे. माझ्या मनात अनेक दिवसापासून खदखद होती. ती



आज मी व्यक्त करत असल्याचे अजय बारसकर म्हणाले. यामुळे मला वारंवार फोन येत आहे, गोळ्या घालून मारून टाकू, अशा धमक्या दिल्या जात आहे. मात्र, मनोज जरांगे यांनी तुकाराम महाराजांचा अपमान केला, ते मी सहन करणार नाही, असं देखील त्यांनी सांगितले.

मनोज जरांगे पाटील यांनी रांजणगाव गणपती येथे उच्चपदस्त अधिकाऱ्यांसोबत गुप्त बैठक घेतली. ३० डिसेंबरला ही गुप्त मीटिंग झाली. त्याचा मी साक्षीदार आहे. तसेच लोणावळा, वाशी येथे देखील मराठा समाजाला डावलून काही बैठका झाल्या. मात्र, अशा गुप्त बैठकांना माझा आक्षेप होता. या गुप्त बैठकांचे अनेक पुरावे माझ्याकडे असल्याचा दावा देखील असे अजय बारसकर महाराज यांनी केला आहे.

जरांगेची मुलगी म्हणते माझ्या बापाच्या देव पाया पडेल. इतका अंहकार मुलांमध्येही आहे. सांगा हा देवापेक्षा मोठा आहे का? हा माझ्यावर आरोप करतो सरकार आणि भुजबळ यांचा माणूस. माझा आणि कोणाचा संबंध नाही. आरक्षण संबंध याने सांगतो. आजपर्यंत एकही पत्र सरकारला त्याने स्वतः दिलं नाही. रोज पलटी मारतो तो. सगळ्या मीटिंग कॅमेरावर करतो, याला घोडा लावतो त्याला घोडा लावतो म्हणतो.

जरांगे यांनी संत तुकाराम महाराजांचा अपमान केला असा आरोप त्यांनी केला. तसेच मी पाणी पाजायला गेलो असताना त्यांनी संत-फिंतगेले खड्ड्यात असं वक्तव्य केलं असंही त्यांनी सांगितल.

मनोज जरांगे हे हेकेखोर असल्याचा आरोप अजय महाराज बारसकर यांनी केला. मी जरांगेंच्या प्रत्येक कृतीला साक्षी आहे , मी प्रसिद्धीसाठी किंवा पैशासाठी काही करतोय मात्र बिलकुल नाही, मी कीर्तन करण्याचेही पैसे घेत नाही असं सांगत अनेक दिवसांपासून आपल्या मनात खदखद असल्याचं त्यांनी सांगितलं.

## अजय बारसकर हा सरकारने लावलेला ट्रॅप-मनोज जरांगे

जालना दि.२१ (प्रतिनिधी)- अजय बारसकर यांनी केलेल्या टीकेनंतर मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. अजय बारसकर हा सरकारचा ट्रॅप असून हा भोंदू महाराज असल्याची सडकून टीका जरांगे पाटील यांनी केली. अजय बारसकर यांनी केलेल्या आरोपांवर मनोज जरांगे पाटील यांनी हा सरकारी ट्रॅप असल्याचा आरोप केला. तुकाराम महाराजांच्या आडून आंदोलन संपवण्याचा घाट असल्याचा घणाघातही जरांगे पाटील यांनी बारसकर यांनी केलेल्या आरोपांवरून केला. बावळटकर बाबाला उत्तर सुद्धा देणार नाही, काय बोंबलायचं ते बोंबल, अन्यथा याला वेगळं वळण लागू शकतं, असा इशाराही त्यांनी दिला. सगसोयऱ्यांची अंमलबजावणी करावी, अशी मागणी मनोज जरांगे पाटील त्यांनी केली.



जरांगे पाटील यांनी अजय बारसकर यांनी केलेल्या टीकेला जोरदार प्रत्युत्तर दिले. तुकाराम महाराजांच्या आडून आंदोलन संपवण्याचा डाव असल्याचा आरोप त्यांनी केला. ते म्हणाले की, मराठा समाजाचं वाटोळं करू नका. तुकाराम महाराजांबद्दल बोललो असल्यास माफी मागतो, हवं तर तोंडावर मारून घेतो, बारसकरांची माफी मागणार नाही. मला पाणी पाजून त्याला मोठं व्हायचं होतं, असा टोलाही त्यांनी यावेळी लगावला.

मराठा आरक्षण आंदोलन संपवण्यासाठी हा ट्रॅप असल्याचा आरोप जरांगे पाटील यांनी केला. एक ट्रॅप झाला असून त्यावेळी त्याला जागा मिळाली नाही हा दुसरा ट्रॅप असून प्रत्येकवेळी कोणीतरी घुसवण्याचा डाव आहे. सरकारचा ट्रॅप सुरु झाला असून सरकारने ट्रॅप बंद करावेत. अजून १६ ते १७ ट्रॅप असून सरकार यांना मायाजाळ्यात अडकवत आहे, आमिष दाखवून भुलवत असल्याचा आरोप त्यांनी केला. या दोन चार जणांना आंदोलनात काही मिळवायच होतं, ते मिळाले नसेल. मुख्यमंत्र्यांच्या पीएसोबत आला होता. आतापर्यंत त्यांना मी ६ महिने गोड होतो. त्यांना ट्रॅप करायचा होता, त्यात शिंदे साहेबांचा आणि त्याचा एक माणूस होता. शिंदे साहेबांचा प्रवक्ता देखील आहे. तो मला बदनाम करण्याचा सरकारचा ट्रॅप होता.

# दिलेले आरक्षण अमान्य; जरांगे पुन्हा कठोर आंदोलनाच्या पवित्र्यात

## गावागावात एकाच वेळी आंदोलन करण्याचे मराठा समाजाला आवाहन

जालना दि.२१ (प्रतिनिधी)- मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षणाच्या मागणीसाठी पुढील आंदोलनाची दिशा ठरवण्यासाठी मनोज जरांगे यांनी आज निर्णायक बैठक बोलावली होती. या बैठकीत २४ फेब्रुवारीपासून आंदोलन करण्याचा निर्णय झाला आहे. तोपर्यंत दोन दिवसांची मुदत सरकारला देण्यात आली आहे. त्यानंतर २४ फेब्रुवारीपासून राज्यभरात प्रत्येक गावात एकाचवेळी रास्ता रोको करण्याचा निर्णय झाला आहे. मात्र, हे सर्व आंदोलन शांततेत करण्याच्या सूचना मनोज जरांगे यांनी बैठकीत दिल्या आहे. विशेष म्हणजे रोज सकाळी साडेदहा वाजता हे आंदोलन केले जाणार आहे.

याबाबत बोलतांना मनोज जरांगे म्हणाले की, "२४ तारखेपासून आंदोलन केले जाणार आहे. आपण फक्त आपले गाव सांभाळायचे, कोणीही तालुक्याला जायच नाही. पूर्ण गाव शक्तीने एकत्रित येतील. यांना आपल्याला जेरीस आणण्यासाठी प्रत्येक गावात आंदोलन करायचं आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या गावात रास्ता रोको आंदोलन करायचं आहे. यावेळी कोणीही जाळपोळ करायची नाही, परीक्षा चालू आहेत. महाराष्ट्रभर आपल्याला रस्त्यावर उतरून आंदोलन करायचे आहे. सकाळी साडेदहा वाजता या आंदोलनाला सुरवात करायची. सकाळी साडेदहा ते दुपारी १ वाजेपर्यंत आंदोलन करायचे. ज्यांना यावेळेत आंदोलन करणे शक्य झाले नाही, त्यांनी संध्याकाळी ४ ते ७ वाजता आंदोलन करायचे. विशेष म्हणजे यापुढे हे आंदोलन रोज करायचे असल्याचे देखील जरांगे म्हणाले आहेत.

शासकीय पदावर असलेल्या आमदार, खासदार मंत्री यांनी आपल्या दारावर येऊ देऊ नका, असे म्हणत आमदार आणि मंत्र्यांना अप्रत्यक्षपणे गावबंदी केली जाणार आहे. निवडणूक काळात आलेल्या मंत्र्या (उमेदवाऱ्याच्या) गाड्या वापस जाऊ देऊ नका, त्याची जाळपोळ न करता ताब्यात घेऊन निवडणुका संपल्यावर परत करा. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निवडणुका पुढे ढकलण्याचे यांना सांगितले पाहिजे, असे मनोज जरांगे म्हणाले आहेत.

२९ तारखेपर्यंत आमच्या मागण्यांची अमलबजावणी नाही केली, तर राज्यातील वृद्ध आणि आमच्या सर्व लोकांनी आमरण उपोषणाला बसायच. उपोषणादरम्यान एकाचाही जीव गेला तर त्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस जबाबदार असतील. जगात असे आंदोलन झाले नसेल हे मुख्यमंत्री शिंदे आणि फडणवीसांना कळेल. वृद्ध नागरिकांना उपोषणाला बसावे लागणार असेल तर यापेक्षा मोठी शरमेची गोष्ट सरकारसाठी असणार नाही. वयोवृद्ध पहिल्यांदा आंदोलनाला बसतील.

### आंदोलनासाठी मनोज जरांगेंचा महत्त्वाच्या सूचना

* प्रत्येकाने आपल्या गावात रस्ता रोको आंदोलन करायचे आहे.
* कोणीही जाळपोळ करायची नाही, परीक्षा चालू असल्याने आंदोलन शांततेत करा.
* सकाळी १०.३० ते १ वाजेपर्यंत आंदोलन करायचे आहे. ज्याला या वेळेत आंदोलन करायला जमले नाही , त्याने संध्याकाळी ४ ते ७ वाजता आंदोलन करावे.
* परीक्षेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना अडचण आली तर त्यांना दुचाकीवरुन परीक्षा केंद्रावर सोडा.
* निष्पाप लोकांवर पोलिसांनी केसेस केल्या तर पूर्ण गाव पोलीस स्टेशनला जाऊन बसा.
* शासकीय पदावर असलेल्या आमदार, खासदार,मंत्री यांना आपल्या दारात येऊन देऊ नका.
* निवडणुकीची आचारसंहिता मोडू नका.

त्यांच्यावर कारवाई झाली झाल्यास हे असे निजमांनी देखील केले नसेल. इंग्रजांनी सुध्दा केले नसते. या सरकारबद्दल वाईट भावना व्यक्त होतील, असे मनोज जरांगे म्हणाले.

(पान ४ वर)

## जरांगेंचा फुगा शरद पवारांनी फुगवला-सदावर्ते

छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- वकील गुणरत्न सदावर्ते यांनी बुधवारी पुन्हा एकदा मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी करणाऱ्या मनोज जरांगे पाटलांवर कडाडून हल्ला चढवला आहे. मनोज जरांगे पाटील सध्या नैराश्यात सापडलेत. त्यांचा फुगा शरद पवार यांनी फुगवला आहे. त्यामुळे मराठा बांधवांनी त्यांच्यापासून दूर रहावे, असे ते म्हणालेत.

राज्य विधिमंडळाने मंगळवारी मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देणाऱ्या विधेयकावर आपली मोहोर उमटवली. पण त्यानंतरही मनोज जरांगे यांनी आपले उपोषण सोडले नाही. त्यांनी मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी केली आहे. यामुळे सरकारपुढे बिकट परिस्थिती उद्भवली आहे. या पार्श्वभूमीवर वकील गुणरत्न सदावर्ते यांनी जरांगे यांच्यावर निशाणा साधला आहे. मनोज जरांगे कोण आहे? ते काय दादा झालेत का? असा सवाल त्यांनी या प्रकरणी छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकारांशी संवाद साधताना उपस्थित केला आहे.

मनोज जरांगे सध्या प्रचंड नैराश्यात सापडलेत. त्यांचा फुगा शरद पवारांसारखे नेते हवा देऊन फुगवत आहेत. त्यांनी असे करू नये. विशेषतः मराठा बांधवांनीही त्यांच्या नादी लागू नये, असे गुणरत्न सदावर्ते यांनी म्हटले आहे. मनोज जरांगे यांनी यापूर्वी मुंबईत येऊन धुडगूस घालण्याची भाषा केली होती. त्यांचा मुंबई वेठीस धरण्याचा डाव होता. त्यावेळी मी त्यांच्याविरोधात भूमिका घेतली. मी दाखल केलेल्या याचिकेनंतर १४९ ची नोटीस निघाली. याद्वारे मी कायद्याचे उल्लंघन करून अशा प्रकारे मुंबईच्या वेशीतही घुसता येणार नाही हे दाखवून दिले, असे सदावर्ते म्हणाले.

## ज्यांना सगळे दिले त्यांनी ५ टक्केही निष्ठा पाळली नाही; शरद पवारांचा वळसे पाटलांवर निशाणा

आंबेगाव दि.२१ (प्रतिनिधी)- आंबेगाव तालुक्यातील अनेकांनी माझ्यासोबत काम केलं आहे. अनेकांनी प्रामाणिकपणे काम केलं, ते हयात नाहीत. पण निष्ठा ही त्यांचे वैशिष्ट्य होतं, पण आज काय पाहतो आपण? त्यांना आम्ही सगळं दिलं. विधानसभा, मंत्री, विधानसभा अध्यक्ष पद, साखर कारखान्याचे राष्ट्रीय अध्यक्ष पद दिलं. मात्र, त्यांनी ५ टक्केही निष्ठा पाळली नाही, ते निघून गेले. असे लोक नागरिकांशी सुद्धा निष्ठा पाळणार नाहीत. त्यांना धडा शिकवण्याची आता वेळ आली आहे, असे आवाहन शरद पवार यांनी आंबेगाव मतदार संघातील लोकांना केले. तर त्यांनी दिलीप वळसे पाटलांना टोला लगावला.

शरद पवार यांची मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या आंबेगाव मतदारसंघात पार पडली. यावेळी शरद पवार यांनी दिलीप वळसे पाटलांना आगामी काळात पराभूत करण्यासाठी कामाला लागण्याच्या सूचना दिल्या.

शरद पवार म्हणाले की, पुढील दोन महिने आम्ही पिंजून काढू. निष्ठवंतांना निवडून आणू, तुम्हीही निष्ठवंतांच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहा, हीच अपेक्षा मी व्यक्त करतो, असे आवाहन त्यांनी केले. राष्ट्रवादी पक्ष आणि घड्याळ चिन्ह दोन्ही अजित पवारांना मिळाल्यावर पवार पुन्हा एकदा मैदानात उतरले आहेत.

## शेतकऱ्यांची दिल्ली कूच उद्यापर्यंत थांबली

अंबाला/चंदीगड दि.२१ (वृत्तसंस्था)- पंजाबच्या शेतकऱ्यांनी शंभू आणि खनौरी सीमेवरून दिल्लीला जाण्याची त्यांची योजना २ दिवस पुढे ढकलली आहे. शेतकरी नेते सर्वन पंढेर म्हणाले की, आम्ही पुढील दोन दिवस रणनीती बनवू एका शेतकऱ्याचा मृत्यू आणि खनौरी हद्दीतील तणावपूर्ण परिस्थितीनंतर शेतकऱ्यांनी हा निर्णय घेतला आहे.

त्याचवेळी खनौरी-दातासिंगवाला सीमेवर शेतकऱ्यांनी पांढरा झेंडा फडकावला, त्यांना प्रत्युत्तर म्हणून प्रशासनानेही पांढरा झेंडा फडकावला. सध्या दोन्ही बाजूंनी शांतता आहे. यापूर्वी दिवसभर शंभू आणि खनौरी हद्दीत शेतकरी आणि पोलिसांमध्ये चकमक झाली होती. पोलिसांनी दिवसभर रबर बुलेट आणि अश्रुधुराच्या नळकांड्या फोडून शेतकऱ्यांना रोखले.

येथे खनौरी सीमेवर एका तरुण शेतकऱ्याचा मृत्यू झाला. हा शेतकरी पंजाबमधील भटिंडा येथील रहिवासी होता. त्यांच्याशिवाय अन्य १२ शेतकरी जखमी झाले असून, त्यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. टोहाना सीमेवर तैनात एसआय विजय कुमार यांची प्रकृती अचानक बिघडली. त्यांना रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

## १० टक्के आरक्षण हा फसवणुकीचा प्रकार-संजय राऊत

मुंबई दि.२१ (प्रतिनिधी)- सरकारने १० टक्के मराठा आरक्षण देण्याचा फसवणुकीचा प्रकार केल्याची प्रतिक्रिया शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी दिली आहे. पत्रकार परिषदेत संजय राऊतांनी मराठा आरक्षणावर भाष्य करताना म्हटलं की, सरकारने १० टक्के आरक्षणाचा फसवणुकीचा प्रकार केला, तो मराठा समाजाला मान्य नाही. त्यांना वाटतंय त्यांची फसवणूक झाली. असं म्हणत संजय राऊतांनी सरकारवर पुन्हा एकदा निशाणा साधला आहे. राज्य सरकारने मराठा आरक्षण विधेयकाचा मसुदा विशेष अधिवेशनात मंजूर केला आहे. यानुसार, मराठ्यांना स्वतंत्र आरक्षण देण्यात येणार आहे. दरम्यान, याला मनोज जरांगे पाटलांसह मराठा समाजाने याचा विरोध केला आहे.

संजय राऊतांनी पुढे म्हटलं की, सरकार त्यांचं समाधान करण्यात अपयशी ठरली आहे. अशा परिस्थितीत उद्या राज्याता कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाली, तर, सरकार गिरीश महाजन, गुलाबराव पाटील यांच्याप्रमाणे वरातीत नाचणार आहे का, हा प्रश्न असल्याचं राऊतांनी म्हटलं आहे. मंत्री रस्त्यावर नाचतायतच आणि जरांगे पाटलांचं उपोषण सुरु आहे, मराठा समाज अस्वस्थ आहे, असं नाचून प्रश्न सुटणार का, असा सवालही राऊतांनी उपस्थित केला आहे. भाजपवर निशाणा साधत संजय राऊतांनी म्हटलं की, भाजपचा फसवाफसवीचा खेळ आहे. ही फसवाफसवी मराठा आरक्षणापासून ते चंडीगड महापौर निवडणुकीपर्यंत सर्वत्र देशात फसवाफसवी सुरु आहे. भारतीय जनता पक्ष फसवाफसवीच्या पायावर उभा आहे आणि ही अत्यंत गंभीर गोष्ट आहे. जरांगेनी बैठक बोलावली असून ते आंदोलनाची पुढची दिशा सांगतील.

## आतापर्यंत साडेतीन हजार कोटींचा ड्रग्स साठा जप्त

पुणे दि.२१ (प्रतिनिधी)- पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने दिल्लीनंतर सांगलीत छापे टाकून मेफेड्रोन (एमडी) जप्त केले. दिल्लीत केलेल्या कारवाईत पोलिसांनी ९७० मेफेड्रोन जप्त करण्यात आले आहे. याप्रकरणी दिल्लीतून दोघांना अटक करण्यात आली आहे. पुणे पोलिसांनी आतापर्यंत साडेतीन हजार कोटी रुपयांचे मेफेड्रोन जप्त केले आहे. दिवेश चिरंजीत भुटिया, संदीप राजपाल कुमार (दोघे रा. नवी दिल्ली) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. मेफेड्रोन निर्मती करणाऱ्या पुणे-सोलापूर महामार्गावरील कुरकुंभ औद्योगिक वसाहतीतील अर्थकेम लॅबोरटीज कंपनीचे मालक भिमाजी उर्फ अनिल परशुराम साबळे (वय ४५), अभियंता युवराज (पान ४ वर)

## शरद पवार गटाला हायकोर्टाकडून नोटीस जारी, ११ मार्चपर्यंत भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश

मुंबई दि.२१ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातील १० आमदारांना अपात्र न ठरवण्याच्या विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयाविरोधात अजित पवार गटानं हायकोर्टात धाव घेतली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रतोद अनिल पाटील यांनी हायकोर्टात दाखल केलेल्या याचिकेची दखल घेत हायकोर्टानं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि शरद पवार गटातील १० आमदारांना नोटीस बजावत भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश दिलेत.

राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रतोद अनिल पाटील यांनी शरद पवार गटातील १० आमदारांना अपात्र न करण्याच्या राहुल नार्वेकरांच्या निर्णयाला आव्हान देत जयंत पाटील आणि अनिल देशमुख यांच्याविरोधात दोन स्वतंत्र याचिका दाखल केल्या आहेत. त्यावर बुधवारी न्यायमूर्ती गिरीष कुलकर्णी आणि न्यायमूर्ती फिरदोश पूनीवाला यांच्या खंडपीठासमोर प्राथमिक सुनावणी झाली.

हायकोर्टानं या याचिकेची दखल घेत राज्य विधिमंडळ सचिवालयासह अन्य सर्व प्रतिवादींना नोटीस बजावली आहे. ज्यात ११ मार्चपर्यंत प्रतिज्ञपत्राद्वारे भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश देत याचिकेवरील पुढील सुनावणी १४ मार्च रोजी घेण्याचं निश्चित केलंय.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी १५ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा अजित पवार यांचाच असल्याचं आपल्या निकालात जाहीर केलं. हे करतानाच दोन्ही गटाच्या आमदारांना पात्र ठरवलं होतं. मात्र पक्ष आमचा असेल तर त्यात दुसरा गट कसा तयार करता येईल?, त्यांना दुस-या पक्षात विलिन व्हावं अन्यथा त्यांना आमचा व्हीप लागू होईल, अशी भूमिका जेष्ठ कायदेतज्ञ मुकुल रोहतगी यांनी हायकोर्टात मांडली.

## बारामतीची लोकसभा निवडणूक सुनेत्रा पवारांनी लढावी ही कार्यकर्त्यांची इच्छा-सुनील तटकरे

पुणे दि.२१ (प्रतिनिधी)- बारामती लोकसभा मतदार संघातून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना उमेदवारी देण्यात यावी अशी कार्यकर्त्यांची आग्रही मागणी आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी बुधवारी येथे आयोजित एका पत्रकार परिषदेत बोलताना स्पष्ट केले. महायुतीत लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपाचा अद्याप कोणताही निर्णय झाला नसल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

बारामती लोकसभा जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष लढवेल. आम्ही या जागेसाठी महायुतीत आग्रह धरणार आहोत. गत अनेक वर्षांपासून हा मतदार संघ आमच्या ताब्यात आहे. आता सुनेत्रा पवार यांनी ही जागा लढवावी अशी कार्यकर्त्यांची मागणी आहे, असे सुनील तटकरे यांनी सांगितले आहे.

# अभ्यासाचा अति ताण विद्यार्थ्यांसाठी जीवघेणा ठरतोय का?

**आज-काल** सातत्याने आपण बघतोय की अगदी तरुण वयातील उच्च शिक्षण घेणारी मुले अभ्यास, प्रॅक्टिकल, अवघड असे अभ्यासक्रम, करिअरमधील वाढती स्पर्धा, गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी असलेल्या अत्यंत कठीण प्रवेश परीक्षा (एन्टरन्स एक्झाम), स्पर्धा परीक्षा, त्यातून परत उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण होण्याचा कौटुंबिक तसेच सामाजिक दबाव, वाढत्या रोजगाराच्या समस्या यामुळे आत्महत्या करताना दिसत आहेत. विशिष्ठ परीक्षेत ठरावीक गुण मिळालेच पाहिजेत अन्यथा चांगले कॉलेज मिळणार नाही, चांगले कॉलेज मिळाले तरी अत्यंत अवघड अभ्यासक्रम झेपलाच पाहिजे, फक्त खूप अभ्यास करून उपयोग नाही, तर भरपूर गुण मिळालेच पाहिजेत. कॅम्पस इंटरव्हूव्हमध्ये निवड पण झाली पाहिजे आणि ताबडतोब मोठ्या पॅकेजची नोकरी तर लागलीच पाहिजे, अशी मानसिकता विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच समाजाची झाली आहे. मोठमोठी शहरे शैक्षणिक हब बनून नावारूपाला येत आहेत. असंख्य क्लासेस, लायब्ररी, सर्वत्र स्टडी मटेरियल, नोट्सची मुबलक विक्री, मोठ्या जाहिराती याला आपण बळी पडतोय हे कोणीच लक्षात घेत नाही.

पालकांसाठी तर लाखो रुपये फी भरून आपले पाल्य कसे मोठ्या शहरातील मोठ्या नामांकित महाविद्यालय, संस्थेत शिकत आहे हा स्टेट्स सिम्बॉल बनला आहे. तुम्ही ज्या गावात किंवा शहरात राहता, ते छोटं आहे, साधं आहे, त्यामुळे तिथे योग्य त्या शैक्षणिक सुविधा नाहीत, अशा ठिकाणी शिकत बसणं म्हणजे कमीपणा, मठ्ठपणा, बुजरेपणा, अडाणीपणा, मागासलेपणा अशी आज-काल संकल्पना रुजू झाली आहे.

मुलांना योग्य वयात आपल्यापासून दूर शिकायला पाठवल्यावरच त्याचे नशीब फळफळणार आहे. पालकांपासून त्याची नाळ तोडल्यावरच तो नावारूपाला येऊन स्वतःला सिद्ध करू शकतो, दुसऱ्या ठिकाणी शिकला तरच आपले पाल्य नाव कमवून यशस्वी होणार आहे अशी बालिश समजूत अनेकांच्या बोलण्यातून जाणवते. सुशिक्षित, अनुभवी पालकांमध्ये सुद्धा हे वैचारिक दारिद्र्य आहे हे दुर्दैवच म्हणावे लागेल.

मुलांना बाहेरील जगाचा अनुभव यावा, पालकांपासून दूर राहिल्यावर स्वतःच्या जबाबदाऱ्या काळाव्यात, दुनियादारी समजावी, त्याने इतर मुलांच्या तुलनेत कमी पडू नये, योग्य वयात नोकरी लागली तर उत्तम व त्याच तोलामोलाचा जोडीदार मिळेल असला काहीसा पायंडा आजकाल पडला आहे. दररोज बदलत जाणारी, नव्याने उदयाला येणारी शिक्षण प्रणाली आत्मसात केलीच पाहिजे, स्वतःला अपडेट ठेवण्याशिवाय पर्याय नाही, असे विद्यार्थ्यांना सुद्धा वाटते. या सर्व परिस्थितीमध्ये मुलांना नेमके काय हवे आहे, काय करायचे आहे, काय शिकायचे आहे, पुढे काय बनायचे आहे, त्याचे ध्येय, स्वप्न, विचार, मानसिकता, योग्यता, कुवत यांचा आपण आई – वडील म्हणून कितपत विचारात घेतो हा गंभीर प्रश्न आहे. मुलांना लाखो रुपये फी भरून नामांकित क्लासेसला पाठवणे, त्यालाच ठाऊक असलेले भरमसाट फी घेणारे कॉलेज शोधले आणि आपल्या मुलाला त्यात ढकलले की पालक म्हणून आपली जबाबदारी संपली का? बाहेरगावी राहताना त्याला हॉस्टेल अथवा रूम बघून दिली, चांगली मेस लावली, शैक्षणिक साहित्य पुरवले म्हणजेच आपण आपले कर्तव्य पार पाडले असे सुशिक्षित उचभ्रू पालकांना वाटते हे दुर्दैव आहे. आपले कर्तव्य केले; आता मुलाने संधीचे सोने करावे आणि झपाटून अभ्यास करावा ही आपली अपेक्षा आपण त्याच्यावर लादत आहोत. पालकांनी मुलांना उच्च दर्जाचे बौद्धिक शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करणे अथवा त्यांची तशी इच्छा असणे हे स्वाभाविक आहे. समाजात वावरताना आपल्याला अभिमानाने सांगता आले पाहिजे की, मुलगा, मुलगी किती यशाची शिखरे सर करत आहे. आपण जे हलाखीचे दिवस काढले किंवा पाहिले ते आम्ही मुलांच्या वाट्याला येऊ देणार नाही. आम्हाला जसे शिकायला मिळाले नाही त्याप्रमाणे आमची मुलेही वंचित राहू नयेत. मुलांनी खूप मोठे व्हावे, संघर्ष करावा, मेहनत करावी, चिकाटी आणि जिद्द ठेवावी अशी अपेक्षा पालकांना असते. अनेक गुणवंत मुले ती अपेक्षा सहजासहजी पूर्ण देखील करतात. अत्यंत कमी वयात खूप छान सेटल होतात व पालकांची स्वप्न पूर्ण करतात.

त्या मुलांचे काय ज्यांना हा सर्व डोलारा पेलणे झेपत नाही. अनेकदा प्रयत्न करूनही अपयश पदरी पडते, त्या मुलांचे काय ज्यांना आई-वडिलांनी सांगितले आहे ते करिअर करायचेच नाहीये त्यांची काही वेगळीच खासियत आहे, त्या मुलांचं काय ज्यांना खूप जीवाचं रान करून पालकांनी भरभक्कम फी भरली म्हणून आता मध्येच माघारी फिरता येत नाही, त्या मुलांचे काय ज्यांच्या मनाला सतत टोचणी लागलेली आहे ती मोठ्या फीची. पालकांनी अतोनात कष्ट करून, पैसे जमवून, कर्ज काढून, तडजोड करून फी भरली तर त्यांना कसे सांगायचे की, मला हे जमत नाही, झेपत नाही, मी दुसरा काही प्रयत्न करतो. घरातील धाक, भीती, दबदबा त्यांना मनातलं मनमोकळे बोलण्याची परवानगी देतो का? हाही तितकाच मोठा प्रश्न आहे.

सगळीच मुले अभ्यास करतात, सगळ्यांना यश येते, आज-काल अशा शिक्षण पद्धतीशिवाय पर्यायच नाही, अत्यंत महागडं उच्चशिक्षण नसेल तर नोकऱ्याच मिळत नाहीत, मुलांची लग्न जमत नाहीत. आज-काल मुलींच्या अपेक्षा खूप वाढल्या आहेत म्हणून या मार्केटमध्ये टिकण्यासाठी आपला मुलगा असो वा मुलगी या शैक्षणिक फॅक्टरीमधून निघून एक उत्तम प्रॉडक्ट बनले पाहिजे या विचाराने सगळ्या पालकांच्या डोक्यात थैमान घातले आहे. आपल्या मुलाला जीव नकोसा होईपर्यंत त्याला आपल्याला सांगावेस वाटत नाही? बोलायची हिम्मत होत नाही? लांब शिकायला गेल्यामुळे तिथून अपयश घेऊन परत गेलो तर आपली आणि पालकांची इज्जत जाईल, नाव खराब होईल म्हणून तिथेच स्वतःला संपवायचं? इतकी दहशत मुलांच्या मनात का आहे, याचा विचार होणे आवश्यक आहे. आपल्या मुलांनी जरूर शिकावे. पण जमेल तेवढे, झेपेल तेवढे आणि आवडेल तेच. आपल्या मुलांनी पैसे कमवावेत, त्याला उत्पन्न असावे. पण त्यासाठी स्वतःच्या सर्व स्वप्नांशी त्याला तडजोड करावी लागू नये, हे विचारात घ्या. पालकांनी मुलांना एवढे नक्कीच सांगावे की जे शिकायचे जे कमवायचे आहे ते सरळ मार्गाने, प्रामाणिकपणे, कोणाला न फसवता, चुकीच्या मार्गाला न जाता, कोणाला त्रास न देता करा. पालकांच्या उत्तम संस्कारांची शिदोरी जर मुलांसोबत असेल तर आयुष्यात ते नक्कीच यशस्वी होतील, कमावते होतील, नावारूपाला येतील. आपले सुसंस्कार, योग्य लक्ष आणि मार्गदर्शन, त्यांना समजून घेण्याची वृत्ती असेल, तर मुलं तुमचं नाव काढणारच हा विश्वास पालकांनी दाखवणे आवश्यक आहे. मुलगा अथवा मुलगी आपली असली तरी ते एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. त्याला स्वतःच्या आवाडी-निवडी, अपेक्षा आहेत. ते अभ्यास करून नोकरी मिळवून पैसे कमवणारे मशीन नसून एक माणूस आहे. त्यामुळे पालकांनी आपली मुले उत्तम माणूस म्हणून कशी पुढे येतील व तशी जगतील यावर लक्ष केंद्रित करावे असे वाटतं.

# राजकारणाची बदललेली परिभाषा

**बालपणापासून** कॉंग्रेस संस्कृतीत वाढलेले आणि गेली ४० ते ५० वर्षे पक्षात कार्यरत असलेले कॉंग्रेस पक्षाचे दिग्गज नेते तसेच महाराष्ट्र राज्याचे दोनदा मुख्यमंत्री पद भूषविलेले अशोक चव्हाण ह्यांनी कॉंग्रेस पक्षाच्या प्राथमिक सदस्यात्त्वाचा तसेच आमदारकीचा राजीनामा देत अखेर भाजपात प्रवेश केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाने सर्वांनाच राजकिय स्वातंत्र्य बहाल केले असल्यामुळे कोण कोणत्या पक्षात जातो किंवा का जातोय हे विचारण्याचा कुणाला अधिकार नाही. तो त्याचा वैयक्तिक निर्णय असतो. परंतु ते ज्या कॉंग्रेस संस्कृतीच्या वातावरणात वाढले, परिपक्व झाले, त्याला सोडचिठ्ठी देण्याचा निर्णय त्यांनी का घेतला ? तसेच त्यांनी ज्या पक्षात प्रवेश केला, त्याचे नेमके कारण काय ? किमान ह्याचा खुलासा करणे त्यांचे कर्तव्य होते. ज्या कॉंग्रेस पक्षात त्यांचे वडील शंकरराव चव्हाण स्वातंत्र्य चळवळीपासून कार्यरत होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री होते. अशोकराव त्यांचे सुपुत्र नसते तर त्यांना इतक्या तरुण वयात आणि संघटनेत भरीव काम न करता मंत्रिपद किंवा मुख्यमंत्री पद मिळाले असते का? म्हणून ज्या पक्षाने त्यांना, कामगिरीच्या जोरावर नाही तर शंकररावांचे पुत्र म्हणुन सत्तेची उच्च आणि अत्युच्च खुर्चीत बसविले, त्या पक्षाचा त्याग करण्याची सबळ कारणे जाहीर केली असती तर जनतेला पडलेल्या प्रश्नांना परस्पर उत्तर मिळाले असते. परंतु भाजपा प्रवेशानंतरच्या पत्रकार परिषदेत ते एकही ठोस कारण सांगू शकले नाही. त्यामुळे जनतेच्या मनातील शंका अधिक दृढ झाली. संरक्षण विभागाच्या जमिनीवर उभारलेल्या आदर्श सोसायटीच्या घोटाळ्यामुळे त्यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला. सध्या ते प्रकरण न्यायालयात प्रलंबित असून भाजपाने नुकत्याच काढलेल्या श्वेतपत्रिकेत त्याचा आवर्जून उल्लेख केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जाहीर सभेत त्याबद्दल टीका केली होती. या पार्श्वभूमीवर त्यांच्या भाजपा प्रवेशाच्या दुसऱ्याच दिवशी त्यांना राज्यसभेची उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे त्यांची भाजपा प्रवेशाचे कारण स्पष्ट झाले. गेल्या काही वर्षांमध्ये विरोधी पक्षांतील राजकारण्यांवर मोठ्या प्रमाणात आर्थिक घोटाळ्या संदर्भात सरकारी यंत्रणांच्या धाडी पडत आहेत. त्यापैकी काही लोकांना तुरुंगवासाचा अनुभव घ्यावा लागला तर काही चौकशीच्या फेऱ्यात अडकून बेजार झाले आहेत. ह्यातील वैशिष्ट्य म्हणजे सत्तेत असणारे किंवा त्यांना पाठींबा देणारे ह्यांच्यापैकी कुणावर अशा प्रकारची चौकशी किंवा भ्रष्टाचाराचे आरोप नाहीत. ज्या लोकांनी सत्तेचा गैरवापर करून घोटाळे केले आहेत, त्यांची पूर्णपणे चौकशी होऊन, त्यांच्यावरील आरोप सिद्ध झाला तर त्यांना शिक्षा झालीच पाहिजे. ह्यात दुमत असण्याचे कारण नाही. परंतु अशा लोकांनी सत्ताधारी पक्षाचा झेंडा खांद्यावर घेताच, त्यांच्या मागे लागलेले चौकशीचे शुक्लकाष्ठ स्थगित झाल्याचे पाहून सर्वसामान्य माणूस बुचकळ्यात पडला आहे.

भारत हा जगातील सर्वांत मोठा लोकशाही प्रणाली असलेला देश आहे. तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानातील कायद्यानुसार चालतो. संविधानाने धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व अंगीकारले असून त्याने स्वातंत्र्य, समता, बंधुत्त्वासह प्रत्येकाला धर्म स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य तसेच राजकिय हक्क प्रदान केले आहेत. त्यानुसार प्रत्येक जण त्याला योग्य वाटणाऱ्या धर्माचे, राजकिय पक्षाचे किंवा संघटनेचे समर्थन करतो. ह्या संवैधानिक लोकशाहीने सत्ताधारी पक्षाबरोबर विरोधी पक्षाला देखील महत्वाची भूमिका बजावण्याचे तसेच चुकीच्या गोष्टींना विरोध करीत व्यक्त करीत त्याची जाहीर वाच्यता करण्याचे अधिकार दिले आहेत. ह्याचाच आधार घेत देशाने स्वातंत्र्यानंतरच्या काही वर्षात विरोधी पक्ष नेत्यांची जनहिताची आंदोलने, खरमरीत केलेली भाषणे, जनतेचे प्रश्न, विकास योजना ह्यावर अभ्यासपुर्ण केलेली निवेदने ह्या देशाने अनुभवली आहेत. त्यामुळे देशाच्या, राज्याच्या भरभराटीला, प्रगतीला, जनहिताच्या योजना पूर्णत्वास नेण्यास मदत झाली आहे.

परंतु हल्ली राजकारणाची परिभाषा बदलून गेली आहे.निव्वळ स्वहित, सत्ता आणि त्यातून मिळणारे फायदे यासाठी राजकारणात येणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. त्यामुळे जनहित, ध्येय, नीतिमत्ता, विचार ह्यांना गुंडाळून ठेवीत, कुणीही कोणत्याही पक्षात प्रवेश करतांना दिसतो. त्यामुळे कोण, कुठल्या पक्षात आहे? हे कळेनासे झाले आहे. राजकारणातील तत्त्व, विचारप्रणाली, समाजाप्रती असलेली त्यागयुक्त कर्तव्य भावना पूर्णता लोप पावली असून त्याची जागा स्वार्थ, कोडगेपणा, दबंगगिरी, झुंडशाही, जातींच्या राजकारणाने धुमाकूळ घातला आहे. कसे ही करून सत्तेत येणे. हे राजकारणात येण्याचे उद्दिष्ट झाले आहे. मग ती सत्ता ग्रामपंचायत, नगरपालिका, विधानसभा ते थेट लोकसभेवर निवडून येण्याची असो वा एखाद्या सरकारी महामंडळावर लावून घेण्याची असो. सध्या घराणेशाहीने राजकारणात पक्का जम बनविल्याचे चित्र आहे. त्याविषयी अधिक न बोललेले बरे. देशाने संविधानाचा स्विकार करून जवळजवळ ७० वर्षे होत आली आहेत.परंतु सत्तेच्या हव्यासापोटी गेल्या ३०/४० वर्षापासुन दलबदलू राजकारणाला उत आल्याचे दिसते. त्यामुळे राजकारणात 'आयाराम, गयाराम' शब्द रूढ झाला आहे. त्यामुळे व्यक्ति स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य आणि राजकिय विचारधारा ह्यांची मुस्कटदाबी होत असल्याचे विदारक चित्र देशाच्या राजकीय क्षितिजावर दिसत आहे.

भारतात भिन्न विचारसरणी किंवा राजकिय भूमिकांमध्ये वैचारिक वाद ही नवीन गोष्ट नाही. परंतु त्याला तारतम्य तर होतेच त्याचबरोबर वैचारिक उंचीची पातळी होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी ह्यांच्या विचारांत टोकाची मतभिन्नता होती. परंतु त्यांनी कधीच समाजहित सोडून व वैयक्तिक फायद्यासाठी एकमेकांवर पातळी सोडून टीका केली नाही. टिळक आगरकर वाद, नेहरू, पटेल, राजेंद्र प्रसाद ह्यांच्यातील विचार भिन्नता, महात्मा गांधी आणि सुभाषचंद्र बोस ह्यांचे मतभेद सर्वश्रुत आहेत. त्यांचे मतभेद विचारधारेत आणि लक्ष्य 'स्वतंत्र भारत' असल्यामुळे त्याची जाहीर वाच्यता झाली नाही. लोकसभा निवडणुक १९८४ ला अटलबिहारी वाजपेयी पराभूत झाले. तेव्हा राजीव गांधींनी 'तुमच्या सारखा नेता विरोधी पक्षात असणे आवश्यक आहे'असे सांगून त्यांना राज्यसभेवर निवडून आणले. महाराष्ट्राला देखील विरोधी पक्ष नेत्यांची मोठी परंपरा आहे. एस.एम. जोशी,उद्धवराव पाटील, आर.डि. भंडारे, कृष्णराव धुळप, उत्तमराव पाटील, मृणाल गोरे ह्यांच्यावर कधीच कोणत्याही प्रकारचे आरोप झाले नाही. तसेच त्यांच्या समकालीन सत्ताधाऱ्यांवर देखील असे आरोप झाले नाही. बाळासाहेब ठाकरे, शरद पवार, डि.बि.पाटील, सुशीलकुमार शिंदे, विलासराव देशमुख, गोपीनाथ मुंढे, मनोहर जोशी ह्या सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नेत्यांनी एका व्यासपीठावर आल्यानंतर, त्यांच्या भाषणातून एकमेकांवर मारलेल्या कोपरखळ्या, प्रसंगोचित घटनांचा उहापोह ह्यांनी वैचारिक उंची अधोरेखित झाल्याचे महाराष्ट्राने अनेकदा अनुभवले आहे.

मग ही राजकिय, सामाजिक परिस्थिती अशीच कायम राहणार का? असा प्रश्न सहाजिकच मनात येतो.परंतु जगात कायम परिवर्तन होत असते. ही गोष्ट विसरून चालणार नाही. ह्या देशात पूर्वापार जाती व्यवस्थेची प्रथा चालत आली होती. तेव्हा ह्या व्यवस्थेच्या पुरस्कर्त्यांना स्वप्नातही वाटले नसेल की,या देशात छत्रपती शाहू महाराज नोकऱ्यांमध्ये आरक्षण सुरू करतील. महात्मा ज्योतीराव फुले स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवतील. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने प्रज्ञासूर्य जन्माला येऊन ही सगळी व्यवस्थाच उध्वस्त करून, या देशातील प्रत्येक नागरिकाला संविधानाने समान हक्क देऊन सगळ्यांना एका रांगेत उभे करील. त्यामुळे आपण आशावादी असणे आवश्यक आहे. ह्या परिस्थितीत देखील बदल होईल. त्यासाठी सर्वसाधारण लोकांचा उघड्या डोळ्यांनी राजकारणात मोठ्या प्रमाणात सहभाग आवश्यक आहे. ह्या देशात मध्यम वर्गाने नेतृत्व करून कैक आंदोलने यशस्वी केली आहेत. सध्या हा वर्ग अलिप्त असल्याचे दिसते. त्या वर्गाने पुन्हा एकदा राजकारणात मुसंडी मारून पुढे यायला पाहिजे. गुंडगिरी प्रवृत्तींच्या लोकांना डोक्यावर घेऊन प्रदर्शन करणे थांबवले पाहिजे. भविष्यात जेव्हा जेव्हा निवडणुकीत मतदान करण्याची वेळ येईल, त्या त्या वेळेस कोणत्याही आमिषाला बळी न पडता, त्या संधीचे सोनं करीत योग्य उमेदवाराला मतदान करून निवडून आणणे हे आपले आध्य कर्तव्य समजले पाहिजे, असे जर आपण करू शकलो तर ती पुन्हा जनहिताच्या राजकारणाची सुरुवात असेल. हे निश्चित.

**– अरूण निकम**

# अमीन सयानी निवेदनाचे सर्वोच्च शिखर

**प्रसिद्ध** रेडिओ निवेदक अमीन सयानी यांचे निधनाने रेडिओ, टेलिव्हिजन आणि अन्य कार्यक्रमातील एका उत्तम निवेदकाला आपण कायमचे गमावले आहे. अमीन सयानी हे मुख्यतः बिनाका गीतमाला किंवा नंतरची सीबाका गीत माला या कार्यक्रमाचे निवेदक म्हणून सर्व श्रोत्यांना परिचित आहेत.



एखाद्या कार्यक्रमाची उत्कंठा चढत्या क्रमाने कशी ठेवता येईल याचा वास्तुनिष्ठ नमुना म्हणजे अमीन सयानी! बिनाका गीतमाला हा जाहिरातीचा संगीतयुक्त कार्यक्रम होता. यामध्ये तत्कालीन चित्रपट गीतांचा क्रम लावण्यात येऊन सर्वोत्तम गाणे सर्वात शेवटी वाजवण्यात येत असे,. एक तासाचा हा कार्यक्रम अनेक दशके रेडिओ श्रोत्यांमध्ये प्रचंड लोकप्रिय होता.

शेवटचे आणि त्या आठवड्यातील सर्वात लोकप्रिय गाणे कोणते याबद्दलची उत्कंठा संपूर्ण कार्यक्रमातून कायम ठेवली जात असे हे अमीन सयानी यांचे वैशिष्ट्य. ज्या काळात रेडिओची संख्या कमी होती अशा काळात ज्यांचे कडे रेडिओ असे, त्यांच्याकडे बुधवारी आठ ते नऊ या काळात, परिसरातील सर्वांनी जमायचे आणि तो कार्यक्रम ऐकायचा हा परिपाठ होता. रेडिओ मालकाला या गोष्टीचा त्या काळात सार्थ अभिमान असे! चित्रपटसृष्टीशी निगडित हा कार्यक्रम असल्यामुळे चित्रपटांच्या लोकप्रियते साठी देखील या कार्यक्रमाचा दाखला देण्यात येत असे. बिनाका काळातील अनेक चित्रपट, ज्यांची गाणी सर्वोत्तम होती असे चित्रपट, रौप्य महोत्सव, सुवर्ण महोत्सवापर्यंत पोहोचले याचे एक कारण बिनाका गीतमाला हे ही होते.

कार्यक्रमाची सुरुवात करताना भाईयो और बहनो अशी न करता 'बहनो और भाईयो 'अशी करून निवेदनातील एक नवा पायंडा अमीन सयानी यांनी पाडला. पुढे निवेदनामध्ये हीच प्रथा पडली, आणि अनेक निवेदकांनी त्यांच्या शैलीचे अनुकरण केले आहे, आणि तसे मान्य ही केले आहे! २१ डिसेंबर १९३२ रोजी जन्मलेल्या या प्रसिद्ध निवेदकाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे १९५१ पासून अगदी शेवटच्या दिवशी पर्यंत निवेदक म्हणून त्यांचे काम सुरू होते. १९५१ पासून त्यांनी ५४ हजार हून अधिक रेडिओ कार्यक्रम आणि १९ ००० पेक्षा अधिक स्पॉट्स किंवा जिंगल्सची त्यांनी निर्मिती केली आहे. निवेदक म्हणून प्रसिद्ध असलेले अमीन सयानी यांनी १९६० ते १९६२ या काळात टाटा ऑइल मिल्स लिमिटेडच्या मार्केटिंग विभागात जय आणि हमाम या साबणासाठी ब्रँड एक्झिक्यूटिव्ह म्हणूनही काम केले होते. त्यांचे बहुतांशी कार्यक्रम रेडिओ सिलोन वरून झालेले असले तरी विविध भारती आणि भारतातील आकाशवाणीवर त्यांनी अनेक कार्यक्रम केलेले आहेत.

सीबाका गीत माला व्यतिरिक्त एस कुमार का फिल्म मुकद्दमा, सॉरीडॉन के साथी, बोर्न विटा कॉन्टॅक्ट इंग्रजीमध्ये, शालीमार सुपर लॅक जोडी, मराठा दरबार शो ,इत्यादी कार्यक्रम अगदी शेवटपर्यंत सुरू होते. बिनाका गीतमाला च्या कार्यक्रमांचे संकलन करून त्याच्या सीडीज तयार करून त्यांनी रसिकांसाठी हा कार्यक्रम कायम स्वरूपात जिवंत ठेवला आहे.

बिनाका गीतमाला हा जाहिरात क्षेत्रातील विक्रमी कार्यक्रम ठरला आहे. त्यानंतर कोणताही कार्यक्रम त्या कार्यक्रमा इतका चालू शकला नाही हा इतिहास आहे, आणि यामागे किंवा या कार्यक्रमाच्या यशामागे फक्त आणि फक्त अमीन सयानी यांच्या निवेदनाचा सर्वात मोठा हात आहे. भारत सरकारने त्यांना २००८ मध्ये पद्मश्री पुरस्काराने गौरवले होते. तसेच रेडिओ मिरची, ॲडव्हर्टायझिंग क्लब ऑफ बॉम्बे, इंडियन अकॅडमी ऑफ ॲडव्हर्टायझिंग फिल्मआर्ट, इंडियन सोसायटी ऑफ ॲडव्हर्टायझर्सकडून सुवर्णपदक अशा प्रकारचे अनेक पुरस्कार त्यांना निवेदक म्हणून प्राप्त झाले आहेत. निवेदनाची स्वतंत्रशैली त्यांनी स्वतंत्रपणे नुसती तयारच केली नाही तर ही शैली अनेक दशके लोकप्रिय केली.

**निवेदनामध्ये त्यांच्या शैलीचे अनुकरण हे आजही करण्यात येते हे त्या शैलीचे वैशिष्ट्य !**

शब्दाचे स्पष्ट उच्चार ,वाक्यांची अचूक फेक आणि योग्य तिथे विनोदाचा वापर हे त्यांच्या निवेदनाचे शेवटपर्यंत वैशिष्ट्य राहिले आहे. केवळ निवेदनाच्या जोरावर जगभरामध्ये लोकप्रियता कमावता येते याचे उत्तम उदाहरण म्हणजे अमीन सयानी. त्यांच्या निधनाने एक चांगला निवेदक गेला असला तरी त्यांचे निवेदन असलेले असंख्य कार्यक्रम आजही सीडी स्वरूपात उपलब्ध असल्यामुळे ते कायम आपल्या सोबत राहतील. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**-डॉ. अभय मंडलिक**

## रेडिओवरचा प्रसिद्ध शैलीदार आवाज हरपला, ज्येष्ठ निवेदक अमीन सायानी यांचे निधन

मुंबई, दि. २१ (प्रतिनिधी) – आपल्या शैलीदार आणि रसाळ निवेदनामुळे जगभरातील संगीतप्रेमींच्या गळ्यातील ताईत बनलेले प्रसिद्ध रेडिओ निवेदक अमीन सायानी यांचे मंगळवारी रात्री हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ९१ वर्षांचे होते. गुरुवारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

बहनों और भाईयों, अगले पायदान पर है ये गाना... असे म्हणत अनेक वर्षे रेडिओवर बिना का गीतमाला हा कार्यक्रम सादर केला. मनाचा ठाव घेणाऱ्या शैलीदार आणि रसाळ निवेदनामुळे ते जगभरातील संगीतप्रेमीच्या गळ्यातील ताईत बनले. रेडिओ सिलोन आणि विविध भारतीवर १९५२ ते १९९४ एवढा प्रदीर्घकाळ चाललेला सर्वाधिक लोकप्रिय रेडिओ कार्यक्रम म्हणून बिना का गीतमाला कार्यक्रमाची नोंद आहे. जवळपास ४२ वर्षे रेडिओवर हा कार्यक्रम तुफान लोकप्रिय ठरला. नंतर २००० ते २००१ आणि २००१ ते २००३ दरम्यान त्यात काही बदल करून हा कार्यक्रम पुन्हा सुरू करण्यात आला होता.

आवाजाचा अनभिषिक्त सम्राट म्हणून ओळखल्या गेलेल्या अमीन सायानी यांनी इंग्रजी भाषेतील निवेदक म्हणून त्यांनी रेडिओवरील कारकीर्दीस सुरूवात केली होती. देश स्वतंत्र झाल्यानंतर त्यांनी हिंदीतून निवेदनास सुरूवात केली होती.

अमीन सायानी यांच्या नावावर तब्बल ५४ हजार रेडिओ कार्यक्रमांची निर्मिती आणि त्यांना आवाज देण्याचा विक्रम नोंदला गेला आहे. १९ हजार रेडिओ जिंगल्सना आवाज दिल्याबद्दलच्या त्यांच्या विक्रमाची नोंद लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये घेण्यात आली आहे.

**आवाज न ऐकताच बिग बीला केले होते रिजेक्ट**

सुमारे ४०–४५ वर्षांपूर्वी बिग बी अमिताभ बच्चन हे ऑडिशन देण्यासाठी मुंबईतील आकाशवाणीच्या स्टुडिओमध्ये गेले होते. परंतु अमीन सायानी यांच्या भेटीची वेळ न घेताच अमिताभ बच्चन स्टुडिओत पोहोचल्यामुळे अमीन सायानी यांनी त्यांना भेटण्यास नकार दिला आणि अमिताभ बच्चन यांचा आवाज न ऐकताच त्यांना सायानी यांनी रिजेक्ट केले होते.

# अबुधाबी येथील बी.ए.पी.एस. मंदिर उद्घाटन सोहळ्याला सनातन संस्थेच्या संतांची वंदनीय उपस्थिती!

अबू धाबी, दि. २१ (वृत्तसंस्था) – भारतात नुकतेच अयोद्धेत श्रीराम मंदिराची निर्मिती झाली आणि रामललाच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठापना भव्य सोहळा अखिल विश्वाने अनुभवला. आता यु.ए.ई. सारख्या इस्लामिक देशातही भव्य अशा बी.ए.पी.एस्. मंदिराची उभारणी झाली आहे. ही एकप्रकारे वैश्विक हिंदु राष्ट्राच्या निर्मितीची नांदी आहेत, असे प्रतिपादन श्रीसत्शक्ति



(सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ यांनी केले. अबू धाबी येथील मंदिर उद्घाटन कार्यक्रमानंतर त्या बोलत होत्या.

या वेळी श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ या म्हणाल्या की, मागील काही शतकांमध्ये भारतातील हिंदु मंदिरांवर आक्रमणे झाली, मंदिरे नष्ट-भष्ट करण्यात आली; आता भारतातील अशा वास्तू पुन्हा कायदेशीर मार्गांनी लढा देऊन हिंदु समाजाला मिळू लागल्या आहेत. त्या ठिकाणी मंदिरे उभी रहात आहेत. इतकेच काय, आता इस्लामी देशांत हिंदु मंदिरांची उभारणी होऊ लागली आहे. हिंदु धर्माची महानता ही काळानुसार विश्वभरात पसरत चालली आहे. हे कालचक्र आहे, ते कोणी रोखू शकत नाही. भारत हा विश्वगुरुपदाकडे वाटचाल करत असल्याचेच हे द्योतक आहे.

पश्चिम आशियातील सर्वांत मोठे हिंदु मंदिर असलेल्या 'बी.ए.पी.एस्. हिंदु मंदिरा'चे उद्घाटन १४ फेब्रुवारी या दिवशी भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. यानिमित्ताने मंदिराच्या वतीने १५ फेब्रुवारी या दिवशी आयोजित 'हार्मनी' या कार्यक्रमाला सनातन संस्थेच्या वतीने सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीसत्शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ आणि श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ यांची वंदनीय उपस्थिती लाभली. मंदिराचे पदाधिकारी श्री. रवींद्र कदम यांनी ऑक्टोबर २०२३ मध्ये मंदिराच्या वतीने उद्घाटन समारंभाचे निमंत्रण पाठवले होते. मंदिराचे प्रमुख महंत स्वामी महाराज यांच्या अध्यक्षतेखाली ..पान ३ वर

# मराठवाड्यातील युवक-युवतींसाठी २३ व २४ फेब्रुवारीला लातूर येथे विभागीय भव्य नमो महारोजगार मेळावा व करिअर मार्गदर्शन शिबीर

## ऑनलाईन नाव नोंदणीसाठी संकेतस्थळ कार्यान्वित

लातूर, दि. २१ (प्रतिनिधी) - राज्य शासनाने प्रत्येक महसुली विभागामध्ये नमो महारोजगार मेळावा व करिअर मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार मराठवाड्यातील युवक-युवतींसाठी करिअर मार्गदर्शन शिबीर आणि विभागीय नमो महारोजगार मेळावा अनुक्रमाने २३ व २४ फेब्रुवारी २०२४ रोजी लातूर येथे होणार आहे. या मेळाव्यामध्ये सहभागी होण्यासाठी ऑनलाईन नोंदणीकरिता पूेः// हर्स्र्ङ्के.ग्ह हे संकेतस्थळ कार्यान्वित करण्यात आले आहे. तरी मराठवाड्यातील सर्व आठही जिल्ह्यातील युवक-युवतींनी रोजगाराच्या संधींचा लाभ घेण्यासाठी या संकेतस्थळवर ऑनलाईन नाव नोंदणी करण्याचे आवाहन राज्याचा कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि लातूर जिल्हा प्रशासनाने केले आहे.

लातूर शहरातील महिला तंत्रनिकेतन समोरील मैदानावर आयोजित नमो महारोजगार मेळावा आणि करिअर मार्गदर्शन शिबिरात मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील युवक-युवतींना एकाच छताखाली रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासोबतच रोजगार, स्वयंरोजगारातील नवीन संधींची ओळख करून देण्यात येणार आहे. यामध्ये २३ फेब्रुवारी रोजी करिअर मार्गदर्शन शिबीर होणार आहे. तसेच २४ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या महारोजगार मेळाव्यात विविध उद्योजक, व्यावसायिक प्रत्यक्ष उपस्थित राहून त्यांच्याकडे असलेल्या रिक्त पदांच्या संख्येनुसार युवक-युवती यांची मुलाखतीद्वारे निवड करतील.

**२३ फेब्रुवारीला मार्गदर्शन शिबिरातून मिळणार करिअरच्या नवीन वाटांची माहिती**

दहावी, बारावी किंवा पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर व्यवसाय, स्वयंरोजगाराच्या संधी, करिअरच्या नव्या वाटांची माहिती युवक-युवतींना व्हावी, यासाठी नमो महारोजगार मेळाव्याच्या पहिल्या दिवशी, २३ फेब्रुवारी रोजी करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये विविध क्षेत्रातील नामांकित आणि तज्ज्ञ व्यावसायिक, उद्योजक यांचे मार्गदर्शन होणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), कृषि उद्योग, पर्यटन, आर्थिक गुंतवणूक, नर्सिंग यासारख्या विविध क्षेत्रातील रोजगार, स्वयंरोजगारातील संधीविषयी व्याख्यान, चर्चासत्र आदी कार्यक्रम होतील. तसेच रोजगार आणि स्वयंरोजगारासाठी विविध शासकीय विभाग, बँकामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची माहितीही दिली जाणार आहे.

**२४ फेब्रुवारी रोजी भव्य महारोजगार मेळाव्यातून रोजगाराच्या संधी**

नमो महारोजगार मेळाव्यामध्ये मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर शहरासह राज्यातील विविध ठिकाणहून उद्योजक उपस्थित राहून शैक्षणिक पात्रता व मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करणार आहेत. यासाठी २४ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ९ पासूनच लातूर शहरातील बार्शी रोडवरील महिला तंत्रनिकेतन समोरील मैदानावर मुलाखतींचे आयोजन करण्यात आले आहे. इयत्ता दहावी, बारावी, तसेच विविध विषयातील पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, आयटीआय (सर्व ट्रेड) आदी शैक्षणिक पात्रताधारक उमेदवार या मेळाव्यासाठी ऑनलाईन नोंदणी करू शकणार आहेत.

**रोजगार मेळाव्यासाठी येथे करा ऑनलाईन नोंदणी**

मराठवाड्यातील युवक-युवतींनी लातूर येथे आयोजित नमो महारोजगार मेळावा व करिअर मार्गदर्शन शिबिरात उपलब्ध रोजगाराच्या संधींचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन नावनोंदणी करावी. ऑनलाईन नाव नोंदणीसाठी https://nmrmlatur.in हे संकेतस्थळ (क्यू आर कोडसह) कार्यान्वित करण्यात आले आहे. यामध्ये 'उमेदवार' पर्याय निवडून लॉगीन करावे. त्यानंतर वैयक्तिक माहिती, ई-मेल आयडी, भ्रमणध्वनी क्रमांक, आधार क्रमांक, महास्वयंम नोंदणी क्रमांक यासह इतर माहिती भरून छायाचित्र, सी.व्ही. (बायोडाटा) अपलोड करावा.

# गडकोट, किल्ले आपला ठेवा; तो जपण्याचे काम करू- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



पुणे, दि. २१(प्रतिनिधी) - छत्रपती शिवाजी महाराजांचे गडकोट किल्ले आपला ठेवा असून तो जपण्याचा प्रयत्न नक्की करू. पहिल्या टप्प्यात शिवाजी महाराजांशी संबंधित विविध २० पर्यटनस्थळे विकसित होत आहेत, त्यात किल्ले रायगडप्रमाणेच शिवनेरीचाही विकास करण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

किल्ले शिवनेरीवर आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्याप्रसंगी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, सहकारमंत्री दिलीप-वळसे पाटील, खासदार डॉ.अमोल कोल्हे, आमदार अतुल बेनके, माजी खासदार तथा म्हाडाचे पुणे गृहनिर्माण मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, माजी आमदार शरद सोनवणे, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य श्रीमती आशाताई बुचके, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, मुख्य वनसंरक्षक एन. आर. प्रवीण, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, उपवनसंरक्षक अमोल सातपुते, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराजांनी वास्तुकला, अभियांत्रिकी, किल्ल्यावरील प्रत्येक थेंब पाण्याचा उपयोग करून घेण्याची दूरदृष्टी दाखवली. शिवछत्रपती म्हणजे पराक्रम, शौर्य, त्याग, समर्पण आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व होते. ते सर्वव्यापी होते आणि त्यांनी सर्वांना बरोबर घेऊन काम केले. ते युगपुरुष, युगप्रवर्तक आणि रयतेचे राजे होते. त्यांनी अठरापगड जातीचे, धर्मांचे लोक एकत्र आणले. प्रजेच्या दुःखापुढे, कल्याणापुढे स्वतःचे दुःख, आराम कवडीमोल मानला. ते केवळ व्यक्ती नाही तर विचार होते. शिवरायांकडील एक तरी गुण आपण घेतला तर शिवजयंती साजरी करताना त्यांना खरे अभिवादन ठरेल. त्यामुळे समाज, राज्य, देश आणि माणूस म्हणून आपण अधिक प्रगती करू.'

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देखील नौदलाच्या कार्यक्रमात शिवछत्रपती यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण केले. नौदलाच्या ध्वजावर शिवप्रतिमेला समाविष्ट केले, ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. कुपवाडा येथे भारत पाकिस्तान सीमेवर लष्करी जवानांनी शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारला आहे. आग्र्याला देखील दिवाण-ए-आम येथे शिवाजी महाराजांची जयंती गतवर्षीपासून साजरी करीत आहोत.

# स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या विविध कलागुणांचा आविष्कार होय -धोंडीरामसिंह राजपूत




वैजापूर, दि. २१ (प्रतिनिधी) - शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कला गुणांचा नवं आविष्कार होय,विद्यार्थ्यांचा संख्यात्मक विकास जेव्हढा महत्वाचा आहे त्यापेक्षा गुणात्मक व कौशल्यत्मक विकास ही महत्वाचा आहे, असे प्रतिपादन माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी तालुक्यातील भगगाव येथील रोम्बस प्रायमरी इंग्लिश स्कुल द्वारा आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन सोहळ्यात केले, प्रास्ताविक विद्यालयाच्या व्यवस्थापिका सौ. प्रणिता साईनाथ पेहरे यांनी केले तर डॉ. साईनाथ पेहरे यांनी आलेल्या सर्व मान्यवरांचे शाल देऊन स्वागत केले. या प्रसंगी पंचायत समितीचे माजी सभापती तथा उपजिल्हाप्रमुख बाबासाहब जगताप यांनी विशद केले की आमदार बोरनारे आपल्या निधीतून या शाळेच्या परिसरात पेवर ब्लॉक बसवून देतील. आ.रमेश पा. बोरनारे यांचे प्रतिनिधी त्यांचे बंधू संजय बोरनारे, शिवसेना तालुका प्रमुख राजेंद्र पाटील साळुंके, गट नेते तथा ओबीसी जिल्हा प्रमुख दशरथ बनकर, नगरसेवक ज्ञानेश्वर माऊली टेके, श्रीकांत साळुंके,दीपक भैया साळुंके, देवगिरी हॉस्पिटलचे प्रसिद्ध हृदय रोग तज्ञ डॉ. गणेश अग्रवाल, वैजापूरचे सोनोग्राफी तज्ञ डॉ. सचिन धोंडीरामसिंह राजपूत, महानुभाव पंथाच्या दीदी, पानवचे सामाजिक कार्यकर्ते अमोल बावचे, भगगाव चेमाजी सरपंच सुखदेव पा. बावचे, सरपंच अशोक अण्णा जगताप, उपसरपंच शरद काळे, भगगाव येथील हरिभाऊ जगताप, अण्णा जगताप, योगेश गायकवाड, आप्पासाहेब पवार, श्रीमती पल्लवी जगताप, श्रीमती शांताबाई शेलार, मंदाबाई जगताप, विमल गोरे, श्रीमती कमल गायकवाड, शरद जुंधारे, श्रीमती रहाटवळ ताई, माजी सरपंच प्रवीण तांबे व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. शालेय विद्यार्थ्यांनी आपल्या कला, गुण, कौशल्य, नृत्य यातून विविध गुंणदर्शन सादर केले. सूत्रसंचलन शिक्षिका निशा पवार यांनी केले. आभार प्रणिता पेहरे यांनी मानले.

पान २ वरून

### अबुधाबी येथील बी.ए.पी.एस. मंदिर उद्घाटन सोहळा...

हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला हरिद्वार येथील आखाड्याचे महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंद 'प्रमुख पाहुणे' म्हणून उपस्थित होते. स्वामी ब्रह्मविहारीदास महाराज यांनी स्वागतपर भाषण केले.

**सनातन संस्थेच्या ३ गुरूंच्या नावे मंदिराच्या बांधकामासाठी ३ विटा अर्पण !**

जुलै २०२२ मध्ये श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ या संशोधनाच्या निमित्ताने संयुक्त अरब अमिरातच्या दौऱ्यावर होत्या. त्या वेळी त्यांनी 'बी.ए.पी.एस्. हिंदु मंदिर'ला भेट देऊन बांधकामाची पहाणी केली होती आणि सनातन संस्थेच्या ३ गुरूंच्या नावाने (सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले, श्रीसत्शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ आणि श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ यांच्या नावे) मंदिराच्या बांधकामासाठी ३ विटा पूजन करून अर्पण केल्या होत्या.

# तरुणांच्या 'जिव्हारी' लागणारा चित्रपट २६ फेब्रुवारी २०२४ रोजी अल्ट्रा झकास मराठी ओटीटीवर!




**देशात** राहणाऱ्या प्रत्येक उभरत्या तरुणाचं परदेशात जाऊन आपलं नशीब अजमावून पहाण्याचं स्वप्न असतं. परदेशात राहणाऱ्या अशाच एका तरुणाची कथा 'जिव्हारी' या चित्रपटात अलौकिक मांडली गेली आहे. २६ फेब्रुवारी २०२४ रोजी अल्ट्रा झकास या मराठी ओटीटीवर चित्रपटाचा वर्ल्ड डिजिटल प्रीमियर होणार असून प्रेक्षकांना चित्रपटाचा अद्वितीय अनुभव घेता येणार आहे.

परदेशात जाऊन नोकरी करणारा महाराष्ट्रातला एक तरुण पुन्हा आपल्या मायदेशी परततो. आपल्या गावी परत आल्यानंतर पुन्हा परदेशाची वाट न धरता इथेच आपल्या उपजीविकेचं साधन शोधण्याचा निर्णय घेतो. जवळजवळ चौदा नोकऱ्या बदलून आई वडिलांवर भार झालेला हा तरुण आयुष्यात पुढे अशी एक गोष्ट करतो, जे सर्वांनाच आश्चर्यचकित करणारं आहे. ती आश्चर्याची गोष्ट काय असेल हे प्रमुख कलावंत निकिता सुरेश कांबळे, सुयोग सुदर्शन भोरे, ओंकारसिंग उदयसिंग राजपूत, नील राजुरीकर, मनीषा दामोदर मोरे या नवोदित कलाकारांच्या दमदार अभिनयाने 'जिव्हारी'ची गोष्ट कळणार आहे. चित्रपटाची निर्मिती, लेखन आणि दिग्दर्शन गणेश शंकर चव्हाण यांनी केली आहे.

'अनेक विषयांवर आधारित चित्रपट आम्ही प्रेक्षकांच्या भेटीस आणत असतो. यावेळी तरुणांना प्रेरित करेल असा आशयघन प्रेरक चित्रपट 'जिव्हारी' अल्ट्रा झकास ओटीटीच्या माध्यमातून आम्ही सादर करत आहोत. यापुढेही प्रेक्षकांचं तासंतास मनोरंजन होईल याकरिता आम्ही सातत्याने नवनवीन धाटणीचे चित्रपट आणण्याच्या प्रयत्नात आहोत.' असे अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रायव्हेट लिमिटेडचे सी.ई.ओ. श्री.सुशीलकुमार अग्रवाल म्हणाले.

# कंत्राटी कामगारांना नियमित रोजगाराच्या मागणीसह स्वतंत्र मजदूर युनियनच्या राष्ट्रीय अधिवेशनाची सांगता

नागपूर, दि. २१ (प्रतिनिधी) - देशातील कंत्राटी कामगारांच्या किमान वेतनामध्ये वाढ करण्यासह त्यांना नियमित रोजगार मिळण्याच्या ठरावासह आज स्वतंत्र मजदूर युनियनच्या राष्ट्रीय अधिवेशनाचे कविवर्य सुरेश भट सभागृहात रमेश रंगारी विचार मंचावरुण समापन झाले.

राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ.के.पी.स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या प्रतिनिधी सत्रात संलग्न संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी आंबेडकरी विचारांची कामगार संघटना देशात मजबूत करण्याचा संकल्प केल्यानंतर विविध ठराव मंजूर करण्यात आले. केंद्र सरकारच्या नौकरी मधील अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,इतर मागासवर्गीयांची रिक्त पदे तात्काळ भरणे, देशातील अंगणवाडी सेविका व मदतनीसांना कामगाराचा दर्जा देऊन किमान वेतन लागू करणे,नवीन पेन्शन योजना ही प्रतिष्ठेसह जीवन जगण्याच्या संविधानीक हक्काच्या विरोधात असल्याने जूनी पेन्शन योजना पुर्वीप्रमाणे लागू करणे, ईपीएफ - ९५ पेन्शन मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार वाढ करणे, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या असंविधानीक क्रिमी लेअरला मान्यता न देणे, स्वतंत्र मजदूर युनियनला राष्ट्रीय कामगार संघटना म्हणून मान्यता देणे, चौदा वर्षेपर्यंत समान, सक्तीचे व मोफत शिक्षण देणे इत्यादी ठराव पारित करण्यात आले. प्रतिनिधी सत्रात स्वतंत्र मजदूर युनियनचे महासचिव ए.व्हि. किरण (विजयवाडा), डॉ. दिनेश निंबरिया (रोहतक), रमेश मेडी (तेलंगणा), महेश चंद्रा (झांसी), सुभाशिनी ( बंगलोर), प्रफुल्लता लोणारे(नागपूर), सागर तायडे (मुंबई), डॉ. लेनिना (नांदेड), सूंदर सुगत (उराई), विनायक जाधव (मुंबई), मुकेश जाटव (दिल्ली) इत्यादींनी आपले विचार व्यक्त केले. या सत्राचे प्रास्ताविक नरेंद्र जारोंडे यांनी संचालन विकास गौर तर आभारप्रदर्शन गणेश ऊके यांनी केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या सर्वांगिण विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोंदीनी रु. १०० कोटी अनुदानास दिली मंजुरी

## खासदार जलील यांनी दिनांक १४ एप्रिल २०२२ रोजी पंतप्रधान यांच्याकडे केली होती मागणी; विद्यापीठाने ही ऑगस्ट २०२३ ला प्रस्ताव पाठविला

**खासदार इम्तियाज जलील यांच्या प्रयत्नांना यश !**

छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी) - खासदार इम्तियाज जलील यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहेबांनी स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्थांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी, मूलभूत व पायाभूत सुविधांचे बळकटीकरण तसेच समस्त विद्यार्थ्यांना व संशोधकांना आधुनिक व दर्जेदार शिक्षण उपलब्ध व्हावे याकरिता १०० कोटीचे विशेष पॅकेज देण्याची मागणी दिनांक १४ एप्रिल २०२२ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पत्राव्दारे केली होती. त्यावेळी सबब मागणीस प्रसारमाध्यमांनी सुध्दा बातमीव्दारे प्रसिध्दी दिली होती. तसेच शिक्षक तज्ञांसह सर्वस्तरातुन खासदार इम्तियाज जलील यांच्या मागणीला पाठींबा मिळाला होता. तसेच विद्यापीठाने ही ३१ ऑगस्ट २०२३ रोजी सादरीकरण करून राज्य शासनाच्या मार्फत सविस्तर माहितीसह प्रस्ताव केंद्रास पाठविला होता.

खासदार इम्तियाज जलील यांनी वेळोवेळी यशस्वीरित्या पाठपुरावा केल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (पीएम-उषा) योजने अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठासाठी रु. १०० कोटी अनुदान मंजुर केले आहे. उद्या दिनांक २० फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता दुरदृष्यप्रणाली व्दारे पंतप्रधान नरेंद्र मोदी अधिकृत घोषणा करणार असल्याची माहिती विद्यापीठाचे कुलसचिव यांनी खासदार इम्तियाज जलील यांना पत्राव्दारे कळविले. खासदार जलील यांनी दूरदृष्यप्रणालीव्दारे होणारे कार्यक्रमास विद्यापीठ परिसरातील सीफार्ट सभागृहात उपस्थित राहण्याची विद्यापीठ प्रशासन, विद्यापीठाचे अधिकार मंडळ, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्यातर्फे आग्रहाची विनंती कुलसचिव यांनी केली.

खासदार इम्तियाज जलील यांनी दिनांक १४ एप्रिल २०२२ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींना दिलेल्या पत्रात नमुद केले की, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहेबांनी आधुनिक शिक्षणापासून कोणीही वंचित राहु नये म्हणुन बौध्द लेणीच्या पायथ्याशी नयनरम्य व जैव विविधता असलेल्या परिसरात एक मोठे शिक्षण ज्ञानकेंद्र उभारलेले आहे. गुणवत्ता व सामाजिक बांधिलकी हे ब्रिद जोपासतांनाच राष्ट्र निर्मितीत योगदान देणारे विद्यार्थी, संशोधक येथून घडलेले आहेत.

स्थापन केलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, मिलिंद कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अॅण्ड साईन्स, डॉ.आंबेडकर लॉ कॉलेज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉमर्स अॅण्ड आर्टस् कॉलेज, पीईएस पॉलिटेक्निक अॅण्ड इंजिनिअरींग कॉलेज, पीईएस फिजिकल एज्युकेशन कॉलेज (बीपीएड), मिलिंद मल्टीपर्पज हायस्कूल व महाविद्यालय या विद्यापीठ व शैक्षणिक संस्थांच्या स्थापनेपासूनच अतिशय चांगले असे शैक्षणिक वातावरण येथे आहे. सबब विद्यापीठ व शैक्षणिक संस्थानात अतिशय महत्वपूर्ण असे ज्ञानदानाचे कार्य प्रामाणिकपणे केले जात आहे.

शिक्षण, संशोधन, विस्तार आणि सेवा या चतु:सुत्रीचा अवलंब विद्यापीठाने केलेला आहे. विविध विद्याशाखांतर्गत पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम, स्पर्धात्मक परिक्षा व प्रमाणपत्र अभ्यासक्रम तसेच नाविण्यपूर्ण अभ्यासक्रम विद्यापीठाने सुरु केलेले आहेत. श्रमप्रतिष्ठेला महत्व देवुन विद्यार्थ्यांमध्ये आत्मभान व स्वयंनिर्भरता या हेतून विद्यापीठ स्तरावर महत्वपुर्ण असे कल्याणकारी योजना राबविले जातात.

विद्यार्थ्यांना, संशोधकांना जास्तीत जास्त शैक्षणिक सुविधा पुरविण्यासाठी शैक्षणिक संस्था व विद्यापीठ प्रशासन अनेक विभागाच्या नवीन इमारती उभारुन रस्ते, पाणी-पुरवठा, विद्युतीकरण यांच्यासह इतर मुलभुत सुविधा देण्यासाठी सतत प्रयत्नशिल असते. याबरोबरच या परिसरात विविध भागातून शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह सुध्दा उभारलेली असल्याचे खासदार इम्तियाज जलील यांनी पंतप्रधानांना दिलेल्या पत्रात नमुद केले आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# विश्रांती नगर येथील रस्ता बाधित १२५ अतिक्रमणे जमीनदोस्त

## दगडफेकीत मनपा व पोलीस कर्मचारी जखमी; लाठीचार्ज, अश्रू धुरांच्या नळकांड्या फोडल्या

छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- शहरातील विश्रांती चौक ,मुकुंदवाडी रेल्वे स्टेशन व झेंडा चौक येथील रस्ता बाधित १२५ अतिक्रमणे आज जमीनदोस्त करण्यात आली. २४ मीटर डीपी रोड वरील सदरील ठिकाणी पत्र्याचे शेड,कच्ची पक्की आर सी सी चे बांधकामे नागरिकांनी केली होती.या ठिकाणी महानगरपालिकेच्या वतीने वेळोवेळी या अतिक्रमण धारकांना सूचित करण्यात आले होते.परंतु अतिक्रमण धारकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन केले नाही व या डिपी रोडवर अतिक्रमण केले. अतिक्रमण हटविण्याची कारवाई सुरू असताना येथे पोलिसांना लाठीचार्ज व अश्रु धुरांच्या नळकांड्या फोडल्या. येथे अवैध धंदे वाढले व अतिक्रमण वाढल्याने सकाळी हि कारवाई सुरू करण्यात आली असताना हि घटना घडली. या घटनेत सहायक पोलिस आयुक्त रनजित पाटील व सात ते आठ पोलिस कर्मचारी व मनपाचे काही कर्मचारी जखमी झाल्याची माहिती मिळाली आहे. एका वर्तमानपत्राच्या छायाचित्रकाराच्या कॅमेराची सुध्दा नुकसान झाले आहे.

या अनुषंगाने या रस्ता बाधित १४० मालमत्ता धारकांना नोटीस वाटप करण्यात आल्या आहेत.त्या पैकी अंदाजे १२० ते १२५ रस्ता बाधित मालमत्ताचे अतिक्रमण पोलीस बंदोबस्तात जमीनदोस्त करण्यात आले.

आज सकाळी मा.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त सौरभ जोशी,उप आयुक्त मंगेश देवरे व सहायक पोलिस आयुक्त रणजीत पाटील यांनी या ठिकाणी आंदोलकांशी चर्चा केली. व सबंधित मालमत्ता धारकांना शासकीय योजनांत लाभ मिळवून देण्याचे आश्वासन दिले.या वेळी मा.आयुक्त महोदयांनी स्पीकर फोन द्वारे आंदोलकांशी संवाद साधला.त्यांनी प्रशासनाची भूमिका समजावून सांगितली.प्रशासानाला आपल्या भावना समजतात,बाधित मालमत्ता धारकांना शासकीय योजनांत लाभ मिळवून देण्याची हमी त्यांनी यावेळी दिली.करिता लेखी द्यायला तयार आहे असे ते म्हणाले .परंतु आंदोलक तत्काळ लेखी द्या यावर ठाम होते. व ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. यामुळे आयुक्त महोदयांनी कारवाई करण्याचे निर्देश दिले.

या नंतर सुध्दा एक शेवटचां प्रयत्न म्हणून पोलीस प्रशासन व मनपा प्रशासनाच्या वतीने आंदोलकांशी चर्चा सुरू केली या दरम्यान अचानक दगडफेक सुरू झाली यात मनपा अतिक्रमण निरीक्षक रामेश्वर सुरासे,नागरी मित्र पथकाचे कर्मचारी,काही पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत.या आंदोलकांना पांगविण्यासाठी पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज केला. यानंतर जेसीबी च्या साहाय्याने पत्र्याचे शेड,आर सी सी चे बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली.उर्वरित कारवाई उद्या परत सकाळी ०८.०० वाजे पासून सुरू करण्यात येणार आहे.



सदर कारवाई मा.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त सौरभ जोशी, उप आयुक्त मंगेश देवरे,सहायक पोलिस आयुक्त रणजीत पाटील,पोलीस निरीक्षक व्यंकटेश केंद्रे, यादव ,गीता बागवडे, तावले,सहायक आयुक्त अर्जुन गिराम,इमारत निरीक्षक सय्यद जमशेद,रविंद्र देसाई,रामेश्वर सूरासे,नागरी मित्र पथकाचे कर्मचारी,जेसीबी पथक कर्मचारी यांनी पार पाडली अशी माहिती अतिक्रमण विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

## महासंस्कृती महोत्सव: आजपासून सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे महासंस्कृती व महानाट्य या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शिवराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त या कार्यक्रमांचे आयोजन होत आहे. दि.२२ ते २६ पर्यंत विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद यानिमित्ताने छत्रपती संभाजीनगरवासियांना घेता येणार आहे.

या महोत्सवाचा उद्घाटन सोहळा गुरुवार दि.२२ रोजी मराठवाडा सांस्कृतिक मंडळाच्या मैदानावर होणार आहे. राज्याचे रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संदिपान भुमरे यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी केंद्रीय रेल्वे राज्य मंत्री रावसाहेब पाटील दानवे राहणार असून केंद्रीय अर्थ राज्य मंत्री डॉ. भागवत कराड, अल्पसंख्याक विकास, औकाफ व पणन मंत्री अब्दुल सत्तार, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेता अंबादास दानवे, लोकसभा सदस्य खा. इम्तियाज जलील, विधान परिषद सदस्य आ. विक्रम काळे, आ. सतिष चव्हाण, विधान सभा सदस्य आ. हरिभाऊ बागडे, आ.प्रदीप जयस्वाल, आ. संजय शिरसाठ, अ. प्रशांत बंब, आ. उदयसिंग राजपूत, आ. रमेश बोरनारे, विभागीय आयुक्त मधुकरराजे आर्दड, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस आयुक्त मनोज लोहिया आदी मान्यवर उपस्थित राहतील. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी व अपर जिल्हाधिकारी तथा संयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. अरविंद लोखंडे यांनी केले आहे.

**महासंस्कृती महोत्सवात सादर होणारे कार्यक्रम याप्रमाणे-**

**गुरुवार दि.२२ रोजी**

सायं. ६ वा. जयभवानी लोककला बहु. विकास मंडळाचे लोककला सादरीकरण, कलावंत गणेश उगले.

सायं. साडेसहा वा. शिवदर्शन सांस्कृतिक शाहिरी संच, कलावंत सुरेश होनाजी जाधव यांचे लोककला सादरीकरण.

सायं.७ वा. सुप्रसिद्ध गायक आदर्श शिंदे संगित रजनी. स्थळ- मराठवाडा सांस्कृतिक मंडळाचे मैदान, खडकेश्वर.

तसेच सकाळी १० वाजल्यापासून शिवछत्रपती वस्तू संग्रहालयास शालेय विद्यार्थ्यांची भेट.

**शुक्रवार दि.२३ रोजी**

सकाळी १० ते १२ महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांचे विविध गुणदर्शन, तसेच अभियांत्रिकी व औषध निर्माणशास्त्र विद्यार्थ्यांचे प्रकल्प प्रदर्शन.

दुपारी १२ वा. आलाप वाद्यवृंद,

दुपारी ३ वा. महिलांचे पारंपारिक खेळ, कलावंत वैजयंती मिसाळ आणि सहकारी,

स्थळ- सिद्धार्थ उद्यान.

सायं. ६ वा. भारुडरत्न निरंजन भाकरे आणि मंडळी यांचे भारुड गायन.

यायं. साडेसहा वा. लोकजागृती बहु. संस्कृ. कला सेवाभावी संस्था कलावंत रामदास धुमाळ यांचे लोककला सादरीकरण.

सायं.७ वा. अवधुत गुप्ते संगित रजनी, स्थळ- मराठवाडा सांस्कृतिक मंडळाचे मैदान खडकेश्वर.

**शनिवार दि.२४ रोजी**

सकाळी १० वा. पारंपारिक क्रीडा प्रकारांचे प्रदर्शन- स्थळ सिद्धार्थ उद्यान.

सायं. ६ वा. आदर्श लोकसेवा सांस्कृतिक मंडळ, कलावंत श्रीमती उषा सुखदेव खोमणे यांचे लोककला सादरीकरण.

सायं. साडेसहा वा. लोकरंजन लोककला प्रतिष्ठन कलावंत शेषराव पठाडे यांचे लोककला सादरीकरण.

सायं. ७ वा. महाराष्ट्राची संस्कृती- शाहीर नंदेश उमप- स्थळ मराठवाडा सांस्कृतिक मंडळाचे मैदान, खडकेश्वर.

**रविवार दि.२५ रोजी**

सायं ६ वा. बहुउद्देशीय सांस्कृतिक मंडळ, चिकलठाणा, कलावंत श्रीमती मीरा उमप यांचे लोककला सादरीकरण.

सायं. साडेसहा वा. ग्रामसेवा मित्रमंडळ, उंडणगाव ता. सिल्लोड कलावंत रुपेश जयदेव ठाकूर यांचे लोककला सादरीकरण.

सायं. ७ वा. 'शिवबा' महानाट्य- स्थळ मराठवाडा सांस्कृतिक मंडळाचे मैदान, खडकेश्वर.

**सोमवार दि.२६ रोजी**

सायं.६ वा. आभा कलामंच, भावसिंगपूरा, कलावंत मदन मिमरोट

सायं. साडेसहा वा. सांस्कृतिक लोककला शिक्षण संस्था गंगापूर कलावंत जालिंदर नाना केरे यांचे लोककला सादरीकरण.

सायं.७ वा. जल्लोष संस्कृती आणि देशभक्तीचा, स्वरराज लाईव्ह म्युझिक. हे सर्व कार्यक्रम विनामूल्य असून सगळ्यांना प्रवेश मोफत आहे, असेही अपर जिल्हाधिकारी डॉ.अरविंद लोखंडे यांनी स्पष्ट केले आहे.

## महानगरपालिकेचे आत्मनिर्भर होणे करिता अजून एक पाऊल पुढे-मनपा प्रशासक

छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका आत्मनिर्भर होण्यासाठी आज अजून एक पाऊल पुढे टाकत आहे असे प्रतिपादन आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांनी मनपा चा वतीने खरेदी करण्यात आलेल्या नवीन चार टिप्पर च्या लोकार्पण कार्यक्रमात केले. आज महानगरपालिका मुख्यालय येथे छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेच्या वतीने १५ व्यां वित्त आयोगा अंतर्गत नवीन चार टिप्परची खरेदी करण्यात आली आहे.या चार टिप्पर चे लोकार्पण मा.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील,कार्यकारी अभियंता अमोल कुलकर्णी,आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ पारस मंडलेचा,यांत्रिकी विभागाचे कर्मचारी,आदी उपस्थित होते.



छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेचे एकूण आठ ४०७/६०८ टिप्पर १५ वर्षे पेक्षा जास्त वयोमानाचे असल्यामुळे शासनाच्या नियमानुसार स्क्रॅप करण्यात आली आहेत.त्या अनुषंगाने १५ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून नवीन चार ६१२ टिप्पर खरेदी करण्यासाठी जीईएम पोर्टल द्वारे जाहीर निविदा मागविण्यात आल्या होत्या.यात मे.चव्हाण ऑटो व्हील्स प्रा. लि.सोलापूर यांचे कडून टाटा मोटर्स बनावटीचे मॉडेल क्रं ६१२ टिप्पर प्रतीनग रुपये १८,७०,०००/- या दराने एकूण चार टिप्पर ७४,८०,०००/- रकमेत खरेदी करण्यात आले आहेत.

खरेदी करण्यात आलेल्या टिप्पर ची क्षमता २.८ घ.न.मीटर असून सदरील चार टिप्पर चा वापर पाणी पुरवठा,बांधकाम ,मलेरिया व अतिक्रमण विभाग अंतर्गत विविध कामांसाठी करण्यात येणार आहे अशी माहिती कार्यकारी अभियंता अमोल कुलकर्णी यांनी दिली आहे.

---

जा.क्र.नपवै/कवि/४/२०२४/३६२
कार्यालय नगर परिषद वैजापूर
जिल्हा :- छत्रपती संभाजीनगर
दि. २१/०२/२०२४

### जाहीर प्रगटन

वैजापूर शहरातील सर्व नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात येते कि, वैजापूर नगर परिषदेचा मालमत्ता कर थकीत असलेल्या नागरिकांच्या मालमत्ता म.न.पा. अधिनियम १९६५ चे कलम १५२ नुसार (अन्वये) अधिपत्र काढून खालील यादी प्रमाणे मालमत्ता अटकाउन ठेवलेल्या आहेत. त्यांच्या कडून अधिपत्र नुसार थकीत असलेले मालमत्ता कर / पाणी पट्टी / जागा भाडे / इमारत भाडे वसूल करण्यासाठी कलम १५६ नुसार जाहीर लिलाव करण्यात येणार आहे. लिलाव मध्ये समविष्ट असलेल्या मालमत्ता धारकांची यादी न.प. कार्यलय मध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील. तरी संबधित लिलाव मध्ये नाव समविष्ट असलेल्या मालमत्ता धारकांनी दि. ३१/०३/२०२४ पर्यंत थकीत असलेले मालमत्ता कर / पाणी पट्टी / जागा भाडे / इमारत भाडे भरणा करून जाहीर लिलावाची कार्यवाही टाळावी.

**स्वाक्षरीत/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद वैजापूर**

---

## जिल्ह्यात जल रथाचा शुभारंभ

छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- ग्रामीण भागात लोकसहभागातून शाश्वत पाणीपुरवठा, गावातील पाण्याचे स्त्रोत शास्वत स्वरूपात निर्माण करून बळकट करणे या उद्देशाने जल जीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन टप्पा -२, गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार व जलयुक्त शिवार या योजना विषयी ग्रामस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती होण्यासाठी राज्य शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून जल रथाच्य माध्यमातून प्रचार प्रसिद्धी करण्यात येणार

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ९ तालुक्यासाठी तयार करण्यात आलेल्या या जल रथाचा शुभारंभ २२ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ९. ४५ मिनिटांनी जिल्हाधिकारी कार्यालयात माननीय जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक विकास मीना यांच्या हस्ते करण्यात येणार आहे

---

(पान १ वरुन)

## दिलेले आरक्षण अमान्य; जरांगे पुन्हा कठोर...

रास्ता रोको करतांना रस्ता कोणताही असो देणे घेणे नाही. आपल्या भागात रास्ता रोको करायचा. तसेच, कोणत्या मुलाला राजकारण्यांने त्रास दिला, तर त्याचा पोरगा, पुतण्या कुठे तर गाठेल, तुझं पोरग कोणत्या तरी शाळेत शिकत असेलच ना, असे म्हणत मराठा आंदोलकांना त्रास देणाऱ्या राजकारण्यांना मनोज जरांगे यांनी इशारा दिला आहे. ज्या मुलांना त्रास होईल, त्यांच्या मदतीला गावांनी जायचं. जाणीवपूर्वक निष्पाप लोकांवर अंदाजे गुन्हा दाखल झाल्यास संपूर्ण गावाने पोलीस ठाणे गाठायचं, असे जरांगे म्हणाले आहे.

तसेच ३ मार्चला पूर्ण राज्यात जिल्ह्याच्या वतीने एकाच ठिकाणी एकच रास्ता रोको करायचा. यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील मराठा बांधवांनी त्या ठिकाणी एकत्र यावे. जिल्ह्यातील प्रत्येक गावातील लोकांनी याठिकाणी सहभागी व्हावेत. दुपारी १२ ते १ वाजेपर्यंत हे रास्ता रोको करायचे आहे, असे जरांगे म्हणाले आहेत.

राज्यातील सर्व मराठा समाजाच्या सरपंच, नगरसेवक, नगराध्यक्ष, महापौर विविध पक्षाचे जिल्हाप्रमुख यांनी आरक्षण मिळेपर्यंत पक्षाच्या कार्यक्रमाला जायचं नाही. १ मार्चला आपले आई-बाप उपोषणाला बसल्यावर आमदार, खासदार यांना आवाहन करायचे की, एकदा तुमच्या मायबाप जनतेला भेटायला यावेत. मंत्री, खासदार, आमदार, माजी आमदार हे कोण-कोण येतात आपण पाहू, जो आला तो आपला असल्याचे जरांगे म्हणाले.

## आतापर्यंत साडेतीन हजार कोटींचा ड्रग्स साठा जप्त

बब्रुवान भुजबळ (वय ४०) यांना अटक केली. यापूर्वी गुंड वैभव उर्फ पिंट्या भारत माने (वय ४२, रा. खडीचे मैदान, सोमवार पेठ), हैदर नुर शेख (वय ४०,रा. विश्रांतवाडी), अजय अमरनाथ करोसिया (वय ३५) यांना अटक करण्यात आली होती. मेफेड्रोन तस्करी प्रकरणात गुंड वैभव उर्फ पिंट्या माने, हैदर शेख, अजय करोसिया यांना सोमवारी गुन्हे शाखेने अटक केली. त्यांच्याकडून साडेतीन कोटी रुपयांचे मेफेड्रोन जप्त करण्यात आले.

---

### छत्रपती संभाजीनगर, महानगरपालिका
**(मालमत्ता व्यस्थापन विभाग)**

जा.क्र./मनपा/मामअ/२०२४/१५५३ दिनांक: २०/०२/२०२४

### जाहीर प्रगटन

छत्रपती संभाजीनगर, महानगरपालिका जाहीर अवाहन करीत आहेत की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या नेहरु भवन येथील खालील नमुद पहिल्या मजल्यावरील दुकानांसाठी निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | मजला | दुकान क्र. | आरक्षणाचा प्रवर्ग | दुकानाचे क्षेत्रफळ (Sqm) | इसारा रक्कम (EMD) | अनामत रक्कम | प्रती महा भाडे (विना GST) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | तळमजला | दुकान क्र. ०१ | खुला प्रवर्ग | १७.०९३ | १,००,०००/- | १२,९९,०६८/- | ५,०५१/- |
| २ | तळमजला | दुकान क्र. ०२ | खुला प्रवर्ग | १६.९१७ | १,००,०००/- | १२,८५,६९२/- | ४,९९९/- |
| ३ | तळमजला | दुकान क्र. ०३ | खुला प्रवर्ग | १६.९१७ | १,००,०००/- | १२,८५,६९२/- | ४,९९९/- |
| ४ | तळमजला | दुकान क्र. ०४ | महिलांसाठी | १६.९१७ | १,००,०००/- | १२,८५,६९२/- | ४,९९९/- |
| ५ | तळमजला | दुकान क्र. ०५ | अनुसुचित जाती जमाती | १६.९१७ | ५०,०००/- | १२,८५,६९२/- | ४,९९९/- |
| ६ | तळमजला | दुकान क्र. ०६ | खुला प्रवर्ग | १६.९१७ | १,००,०००/- | १२,८५,६९२/- | ४,९९९/- |
| ७ | तळमजला | दुकान क्र. ०७ | खुला प्रवर्ग | १६.९१७ | १,००,०००/- | १२,८५,६९२/- | ४,९९९/- |
| ८ | तळमजला | दुकान क्र. ०८ | खुला प्रवर्ग | १६.९१७ | १,००,०००/- | १२,८५,६९२/- | ४,९९९/- |
| ९ | तळमजला | दुकान क्र. ०९ | खुला प्रवर्ग | १६.९१७ | १,००,०००/- | १२,८५,६९२/- | ४,९९९/- |
| १० | तळमजला | दुकान क्र. १० | खुला प्रवर्ग | १६.९१७ | १,००,०००/- | १२,८५,६९२/- | ४,९९९/- |
| ११ | तळमजला | दुकान क्र. ११ | खुला प्रवर्ग | १६.९१७ | १,००,०००/- | १२,८५,६९२/- | ४,९९९/- |
| १२ | तळमजला | दुकान क्र. १४ | खुला प्रवर्ग | २२.९१६ | १,००,०००/- | १७,४१,६१६/- | ६,७७२/- |
| १३ | तळमजला | दुकान क्र. १५ | दिव्यांग | २४.२६४ | ५०,०००/- | १८,४४,०६४/- | ७,१७१/- |
| १४ | तळमजला | दुकान क्र. १६ | खुला प्रवर्ग | २५.६१२ | १,००,०००/- | १९,४६,५१२/- | ७,५६९/- |
| १५ | तळमजला | दुकान क्र. १७ | खुला प्रवर्ग | २६.९६० | १,००,०००/- | २०,४८,९६०/- | ७,९६७/- |
| १६ | तळमजला | दुकान क्र. १८ | खुला प्रवर्ग | २८.३०८ | १,००,०००/- | २१,५१,४०८/- | ८,३६६/- |
| १७ | तळमजला | ॲन्कर शॉप G-1 | खुला प्रवर्ग | २८५ | १,००,०००/- | २,१६,६०,०००/- | ८४,२२४/- |

उपरोक्त जाहिर निविदा भरण्याची मुदत दि. २२/०२/२०२३ ते दि. २१/०३/२०२३ पर्यंत राहील. सदरील जाहिर निविदा महानगरपालिकेच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

करीता इच्छूक नागरिकांनी निविदेमध्ये सहभाग घ्यावा.

**मा. आयुक्त तथा प्रशासक महोदय यांची मान्यता.**

**सहाय्यक आयुक्त**
**मालमत्ता व्यवस्थान विभाग**
**छत्रपती संभाजीनगर, महानगरपालिका**

---

### नगर परिषद वैजापूर जि. औरंगाबाद

**फोन नंबर (०२४३६-२२२०३६, फॅक्स नंबर (०२४३६-२२५२५६)**
**Email:npvaijapur@gmail.com**

जा.क्र.नपवै/कावि/पापुवस्वвि/२०२४/
दिनांक :- २१/०२/२०२४

### निविदा सुचना

वैजापूर नगर परिषद न.प. फंड व इतर शासकीय निधी अंतर्गत खालील दर्शविलेल्या कामासाठी अनुभवी रजिष्टर्ड गुत्तेदाराकडून/ एजन्सी धारकाकडून निविदा मागवित आहे. कोरे निविदा प्रपत्र सुटीचे दिवस वगळून दि.२८/०२/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यन्त खालील प्रमाणे निश्चित किंमत लेखा विभागात जमा केल्यानंतर नगर परिषद कार्यालयात पाणी पुरवठा व स्वच्छता विभागात मिळतील.

गुत्तेदाराने मोहोरबंद निविदा दोन लिफाफा पध्दतीत (तांत्रिक लिफाफा मध्ये सर्व पात्रते विषयक सर्व कागदपत्रे तसेच निविदा प्रपत्र किंमत व इसारा रक्कम भरले बाबतची पावती सादर करावे. आर्थिक लिफाफामध्ये स्वाक्षरीत दर भरलेले निविदा प्रपत्र सादर करावे) नगर परिषद वैजापूर कार्यालयामध्ये दिनांक २८/०२/२०२४ रोजी कार्यालयीन वेळ संपेपर्यन्त सादर कराव्यात.

१) जमा केलेल्या निविदा प्रपत्र व इसारा रकमेची पावती क्रमांम सिलबंद तांत्रिक व आर्थिक लिफाफावर नमुद करावा, वरील रक्कम भरणा केल्या शिवाय निविदा स्विकारली जाणार नाही. २) इतर अटी व शर्ती तसेच अंदाजपत्रकाची प्रत निविदा प्रपत्रासोबत देण्यात येईल. ३) कोणतीही निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार न.प. ने राखून ठेवला आहे.

**कामाचा तपशिल खालील प्रमाणे.**

| अ.क्र | कामाचे नांव | इसारा रक्कम | निविदा प्रपत्र रक्कम |
|---|---|---|---|
| १ | नगर परिषद वैजापूर पाणी पुरवठा विभाग अंतर्गत सन २०२४-२५ करीता सर्व प्रकारचे यांत्रिक व विद्युत विषयक देखभाल दुरुस्ती | १००० | ३००० |

**स्वाक्षरीत/-** **(सु.प्र.चिमटे)** **पा.पु.व स्व.अभियंता** **नगर परिषद वैजापूर**

**स्वाक्षरीत/-** **(पी.व्ही.पाटील)** **शहर अभियंता** **नगर परिषद वैजापूर**

**स्वाक्षरीत/-** **(बि.यु.बिघोत)** **मुख्याधिकारी** **नगर परिषद वैजापूर**